www.dainikmahabharat.com
RNI No. MAHMAR/2015/64418
jaymahabharat2015@gmail.com

## नवल किशोर राम मधून थेट पुण्याचे आयुक्त, भाग्यश्री विसपुते धुळ्याच्या कलेक्टर

प्रतिनिधी @ मुंबई

मुंबई : राज्यात प्रशासकीय खांदेपालट सुरूच असून आताही आठ वरिष्ठ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश जारी करण्यात आले आहेत.


# दैनिक महाभारत




संपादक – विजयकुमार वाव्हळ

महाराष्ट्र • बीड (महाराष्ट्र) • दैनिक • मराठी • वर्ष – १० • अंक २८० • गुरूवार दि.२२ मे २०२५ • किंमत २ रू. • पाने ६

छत्रपती संभाजीनगर, नागपुर, नाशिक, मुंबई, रायगड, पुणे, कोल्हापुर, अहिल्यानगर, अमरावती, ठाणे, सोलापूर, नांदेड, लातुर, धुळे, जालना, धाराशिव, मुंबई, हिंगोली, परभणी, जळगांव, वर्धा, सातारा येथुन प्रकाशित होणारे मराठवाड्यातील एकमेव दैनिक


छगन भुजबळ फडणवीस यांच्या मंत्री मंडळात सन्मानीय मंत्री झाले याचा मला मनस्वी आनंद होतो आहे.या मुळे संपूर्ण भाजपा,महाराष्ट्राचा नकली चाणक्य यांची लेवल जनतेला समजली.मुलुंड चा नागडा पोपटलाल तर बेवा झाला!ढोंगी आणि बकवास लेकाचे!
संजय राऊत



सिर्फ़ फ़िल्म या जीवनी नहीं, बहुजन समाज के उस इतिहास को मान्यता देने की एक अच्छी पहल है, जो हमारी शिक्षा की मुख्यधारा से गायब है।ऐसी फ़िल्में और बननी चाहिए जो बहुजन इतिहास और संघर्ष को सामने लाएं – उन्हें देखकर, पढ़कर और पहचानकर ही न्याय की आवाज़ और बुलंद होगी।
राहुल गांधी



यूपी के प्राइमरी व अपर प्राइमरी स्कूलों में सन २०२३–२४ में १.७४ करोड़ दाखिले हुए, किन्तु २०२४–२५ में मात्र १.५२ करोड़ अर्थात स्कूल दाखिला में लगभग २२ लाख की गिरावट सरकारी स्कूल व्यवस्था की ऐसी बदहाल स्थिति गंभीर व चिन्तनीय। शिक्षा के महत्व व जरूरत पर सरकार का उचित ध्यान जरूरी।
मायावती



जमीन खरेदीसाठी दोन कोटी रुपये माहेरून आण म्हणून सुनेचा अत्याधिक छळ करून तिची हत्या /आत्महत्या इथपर्यंत मजल मारणाऱ्या मुळशी तालुका राष्ट्रवादी अध्यक्ष राजेंद्र हगवलेला अटक कधी होणार ? अजितदादा, तुम्ही सत्तेत आहात.पदाधिकाऱ्याला वाचवणार की हुंडाबळी ठरलेल्या वैष्णवीला न्याय देणार?
सुषमाताई अंधारे



# शेतकऱ्यांना बियाणे, खते याचा कुठलाही तुटवडा पडणार नाही– मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

प्रतिनिधी । मुंबई

राज्यामध्ये आवश्यक तेवढा बियाण्याचा पुरवठा आणि आवश्यक तेवढे खत उपलब्ध आहे. बियाणे, खते याचा कुठलाही तुटवडा महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना पडणार नाही. साधारणपणे मागील वर्षांचा कल पाहता कुठले पीक कुठे कमी–अधिक प्रमाणात घेता येईल, याचा विचार करूनच त्या ठिकाणी बियाण्याची उपलब्धता करून देण्यात आलेली आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिली.

आज मुंबईतील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे कृषि विभागाच्या राज्यस्तरीय खरीप हंगाम नियोजनाची आढावा बैठक मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या खरीप हंगाम आढावा बैठकीची माहिती देण्यासाठी पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी त्यांनी ही माहिती दिली. या पत्रकार परिषदेला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, जलसंपदा मंत्री गिरीष महाजन, कृषी मंत्री ड.माणिकराव कोकाटे, राज्यमंत्री ड आशिष जयस्वाल, प्रधान सचिव प्रविण दराडे, प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी तसेच कृषी आयुक्त सुरज मांढरे उपस्थित होते.

बोगस बियाण्यांवर आळा घालण्यासाठी 'साथी' पोर्टल

मुख्यमंत्री म्हणाले की, बोगस बियाण्यांवर आळा घालण्यासाठी महाराष्ट्राने पहिल्यांदा केंद्र सरकारच्या 'साथी' या पोर्टलवर बियाणे नोंदणी करण्याचा नियम केला आहे. या नोंदणीमुळे हे बियाणे ट्रेसेबल होणार आहे. दुर्दैवाने राज्यांमध्ये जे बियाणे विकलं जाते, त्याच्यापैकी ७५% बियाणे हे बोगस असून ते उत्पादकांनी तयार केलेले नसते. त्यामुळे या वर्षीपासून हे सर्व प्रकारे बियाणे 'साथी' या पोर्टलवर आणायचा निर्णय घेण्यात आला असून त्यास केंद्र सरकारने मान्यता दिली आहे. आता जवळपास ७० हजार क्विंटल बियाणे पोर्टलवर उपलब्ध असून ते ट्रेसेबल आहे. त्यामुळे याच्यामध्ये बोगसगिरी झाली तर तर कोणामुळे झाली हे लक्षात येऊ शकणार आहे. पुढच्या वर्षांपासून १००% बियाणे 'साथी' या पोर्टलवर असेल, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

खतांच्या बाबतीत लिंकिंगची तक्रार सातत्याने येत असल्याचे सांगून मुख्यमंत्री म्हणाले की, लिंकिंग संदर्भात अतिशय कडक अशा प्रकारचा निर्णय घेण्यात आलेला आहे. आता प्रत्येक कृषी केंद्राच्या बाहेर लिंकिंगच्या संदर्भातला बोर्ड लावून त्यावर फोन नंबर देण्यात येणार आहे. त्यामुळे लिंकिंगचा कुठे आग्रह झाला तर त्यासंदर्भात त्या नंबरवर फोन केल्यास संबंधितांवर कारवाई केली जाईल, हेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी स्पष्ट केले आहे.



कृषी विभागाने एआय बेस्ड 'महाविस्तार' हे मोबाईल प लॉन्च केले असून या पवर शेतीच्या संदर्भातली सगळी माहिती आणि व्हिडिओज उपलब्ध असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. शेतकऱ्यांना शेतीतील कुठलाही प्रश्न आला, कुठली लागवड करायची आहे, त्याची काय पद्धती आहे, कुठले कीड व्यवस्थापन करायचे आहे, त्याची काय पद्धती आहे, काय वापरले पाहिजे, कुठल्या स्टेजवर काय वापरले पाहिजे, अशी सगळी माहिती, त्याचे व्हिडिओज त्या पमध्ये असल्याचे त्यांनी सांगितले. या पमध्ये मराठी भाषेत चॅटबॉट असून त्यावर कुठलाही प्रश्न विचारला असता त्याला योग्य उत्तर मिळते. असा हा शेतकऱ्यांचा डिजिटल मित्र राज्यातील प्रत्येक शेतकऱ्यांनी आपल्या मोबाईल डाऊनलोड करून शेतीसंदर्भातील सर्व माहिती मिळवावी, असे आवाहन मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी केले.

## ट्रम्प यांची व्हाइट हाऊसमध्ये दक्षिण आफ्रिकेच्या राष्ट्रपतींशी खडाजंगी

### अमेरिकन राष्ट्रपतींचा आरोप– गोऱ्या शेतकऱ्यांचा नरसंहार झाला

प्रतिनिधी । न्युयॉर्क

बुधवारी व्हाइट हाऊसमध्ये माध्यमांसमोर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि दक्षिण आफ्रिकेचे राष्ट्राध्यक्ष सिरिल रामाफोसा यांच्यात जोरदार वादविवाद झाला. दक्षिण आफ्रिकेत गोऱ्या शेतकऱ्यांची कत्तल होत असल्याचा आरोप ट्रम्प यांनी केला.

ओव्हल ऑफिसमध्ये झालेल्या बैठकीदरम्यान ट्रम्प यांनी पुरावा म्हणून एक व्हिडिओ दाखवला आणि दावा केला की दक्षिण आफ्रिकेत गोरे लोक मोठ्या प्रमाणात लक्ष्य केले जात आहेत. यामुळे शेतकरी अमेरिकेकडे धावत आहेत. रामाफोसा यांनी यावर कारवाई करावी.

तथापि, रामाफोसा यांनी हे दावे फेटाळून लावले आणि म्हटले की नरसंहाराचे आरोप खोटे आहेत. त्यांनी अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांना सांगितले की,




दक्षिण आफ्रिकेतील सर्व वंशांचे लोक हिंसक गुन्ह्यांमुळे त्रस्त आहेत. त्यापैकी बहुतेक कृष्णवर्णीय आहेत. तिथे फक्त गोऱ्या लोकांचाच छळ होत नाहीये.

रामाफोसा यांनी ट्रम्प यांना कतार सरकारकडून भेट म्हणून मिळालेल्या विमानावरही टीका केली. ते म्हणाले– आमचे सरकार दक्षिण आफ्रिकेतील वर्णभेद नष्ट करण्याचा प्रयत्न करत आहे. तथापि, मला वाईट वाटते की माझ्याकडे तुम्हाला देण्यासाठी विमान नाही, ज्यावर ट्रम्प यांनी उत्तर दिले– कदाचित तुमच्याकडे असले असते?

## लाडकी बहीण योजनेच्या यशानंतर आता सरकारने आणली आणखी एक मोफत योजना

प्रतिनिधी । नागपुर

महायुतीच्या यशामागे मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा यशस्वी प्रचार आणि महिला मतदारांवर त्याचा दिसून आलेला सकारात्मक प्रभाव असल्याचे जाणकार सांगतात. राज्य सरकारने पुन्हा एकदा महिलांना आनंद देणारी आणि आत्मनिर्भर करणारी योजना आणली आहे.त्यामुळे महिलांना उद्योजक होता येणार आहे. महाराष्ट्र सरकारने गरीब व गरजू महिलांसाठी एक खूप चांगली योजना सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत महिलांना मोफत पिठाची गिरणी दिली जाते. यामुळे त्या स्वतःचा छोटा व्यवसाय सुरू करू शकतात आणि घरखर्चासाठी पैसे कमवू शकतात. सरकारचे उद्दिष्ट हे आहे की महिलांनी कुणावर अवलंबून न राहता स्वतःच्या पायावर उभे राहावे. तुम्ही जर या योजनेला पात्र असाल, तर ही संधी नक्की वापरा. लवकर अर्ज करा, सरकारची मदत घ्या आणि स्वतःचा



व्यवसाय सुरू करा. आता वेळ आहे स्वप्न पूर्ण करण्याची!

या योजनेत किती मदत मिळते?

सरकार या योजनेत ९०% पैसे देते. म्हणजे जर गिरणी घेण्यासाठी १०हजार रुपये लागले, तर त्यातले ९ हजार रुपये सरकार देते आणि फक्त १ हजार रुपये महिलेला भरावे लागतात. त्यामुळे कमी पैशात गिरणी मिळते आणि व्यवसाय सुरू करणे सोपे होते.तुम्ही घेऊ शकता योजनेचा लाभ अर्ज करणारी महिला महाराष्ट्रातली असावी ती अनुसूचित जाती किंवा जमातीची असावी वय १८ ते ६० वर्षांच्या दरम्यान असावे तिच्या कुटुंबाचे एकूण वार्षिक उत्पन्न १.२० लाखांपेक्षा कमी असावे ग्रामीण भागात राहणाऱ्या महिलांना आधी संधी दिली जाते. अर्ज करताना लागणारी कागदपत्रे आधार कार्ड जात प्रमाणपत्र रेशन कार्ड उत्पन्नाचा दाखला रहिवासी प्रमाणपत्र बँकेचे पासबुक गिरणी खरेदीसाठी कोटेशन (गिरणी किती रुपयांना मिळणार आहे ते लिहिलेला कागद)

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती उत्सवाचे राष्ट्रपतींना निमंत्रण

मुंबई/ बी.डी.गायकवाड :– पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती उत्सवाचे निमंत्रण राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना देण्यात आल्याची माहिती विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

दरवर्षी ३१ मे रोजी अहिल्यादेवी होळकर यांची जन्म जयंती साजरी केली जाते. यंदा अहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी जयंती त्यांच्या जन्म गावी अहिल्यानगर येथील जामखेड तालुक्यातील चौंडी येथे भव्य स्वरूपात होणार आहे. त्याचे निमंत्रण राष्ट्रपती यांना देण्यासाठी आज श्री. शिंदे आले असून राष्ट्रपती श्रीमती मुर्मू यांच्या भेटीनंतर त्यांनी महाराष्ट्र सदन येथे आयोजित पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. यावेळी सांगली महानगर



पालिकेच्या महापौर संगिता खोत, ड. वीणा सोनवलकर, डॉ. उज्वला हाके, डॉ. स्मिता काळे, मानिका गहानवर या उपस्थित होत्या.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य महान आहे. त्या काळात समाजातील रूढी परंपरेला झुगारून त्यांनी धर्माचे, संस्कृतीचे रक्षण केले. देशभरातील १२ ज्योर्तिलिंगांचा जीर्णोध्दार त्यांनी केला. काशी विश्वनाथ मंदिराची पुर्नबांधणी, अनेक ऐतिहासीक धार्मिक स्थळांवरील घाटांचे निर्माण, विहीरींचे बांधकाम, रस्त्यांच्या कडेवरील वृक्षारोपण असे अनेक कामे त्यांच्या हातुन घडलीत, अशी माहिती श्री शिंदे यांनी यावेळी सांगितली. चौंडी या त्यांच्या जन्मगावी होणाऱ्या जयंती महोत्सवाच्या कार्यक्रमात यापुर्वी राष्ट्रपती शंकरदयाळ शर्मा, लोकसभा सभापती सुमित्रा महाजन, राज्याचे मुख्यमंत्री, अनेक केंद्रीय मंत्री आल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

## पाकिस्तानात गृहयुद्ध : स्कूलबसवर हल्ला, सहा जणांचा मृत्यू

### मृतांमध्ये तीन बालकांचा समावेश, ३८ जण जखमी

प्रतिनिधी । कराची

पाकिस्तानच्या बलुचिस्तान प्रांतातील खुझदार जिल्ह्यात बुधवारी शाळेच्या बसवर आत्मघाती हल्ला झाला. या भीषण घटनेत किमान सहा जणांचा मृत्यू झाला असून, त्यामध्ये तीन लहान मुलांचा समावेश आहे.या हल्ल्यात आणखी ३८ जखमी झाले आहेत. भारताशी संबंधित गटांनी हा हल्ला केल्याचा दावा पाकिस्तानी लष्कर व त्या देशाचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी केला. तो भारताने फेटाळून लावला आहे. पाकिस्तानचे राष्ट्राध्यक्ष आसिफ अली झरदारी यांनीही या हल्ल्याचा तीव्र निषेध केला.भारतावरही बिनबुडाचे आरोप खुझदार येथील हल्ला भारताचा पाठिंबा असलेल्या गटांनी केला, असा दावा पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी केला. पाकिस्तानचे आरोप फेटाळताना भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी सांगितले की, बिनबुडाचे आरोप करण्याची पाकिस्तानला सवय आहे. पाकिस्तान हे दहशतवादी कारवायांचे मुख्य केंद्र असल्याची प्रतिमा झाकण्यासाठी तो देश असे आरोप करत असतो.चोलिस्तान कालव्यावरून संघर्ष पेटला चोलिस्तान कालवा प्रकल्पाच्या मुद्द्यावरून पाकिस्तान पीपल्स पार्टीचे सिंध प्रांतातील सरकार व पंतप्रधान शाहबाज शरीफ यांचे सरकार यांच्यात तीव्र मतभेद निर्माण झाले आहेत. सिंधू नदीवर सहा कालवे बांधून चोलिस्तानच्या वाळवंटी भागात सिंचनासाठी पाणी पोहोचविण्याचा शरीफ सरकारचा विचार आहे. मात्र, सिंधमधील स्थानिक राजकीय पक्ष, धार्मिक संस्था, कार्यकर्ते व वकिलांनी या प्रकल्पाला तीव्र विरोध केला आहे.



## चकमकीत २७ नक्षलवादी ठार

प्रतिनिधी । छत्तीसगड

छत्तीसगडमधील नारायणपूर जिल्ह्यात आज सुरक्षा दल आणि नक्षलवाद्यांमध्ये झालेल्या चकमकीत सुरक्षा दलांना मोठे यश मिळाले. या चकमकीदरम्यान, सुरक्षा दलांनी २७ नक्षलवाद्यांना ठार केले आहे. ज्यामध्ये वसवराजूचा समावेश होता, ज्याच्यावर १ कोटी रुपयांचे बक्षीस होते. या चकमकीत एक जवान देखील शहीद झाला तर एक जखमी झाला असल्याची माहिती समोर आली आहे.

पोलिस अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, अबुझमद परिसरात सकाळी सुरक्षा दल आणि नक्षलवाद्यांमध्ये चकमक सुरू झाली. नारायणपूर जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक प्रभात कुमार म्हणाले की, जिल्ह्यातील अबुझमद भागातील माड विभागात नक्षलवाद्यांच्या उपस्थितीच्या माहितीच्या आधारे, जिल्हा राखीव रक्षक नारायणपूर, डीआरजी दंतेवाडा, डीआरजी बिजापूर आणि डीआरजी कोंडागाव यांचे संयुक्त पथक कारवाईसाठी रवाना करण्यात आले.

छत्तीसगडचे उपमुख्यमंत्री विजय शर्मा म्हणाले, आमचा एक सैनिक जखमी झाला आहे, तो धोक्याबाहेर आहे. सैनिकांनी चमत्कार केला आहे. २६ हून अधिक नक्षलवादी मारले गेले आहेत. अंतिम शोध मोहीम सुरू आहे. मोठे नक्षलवादी मारले जाण्याची शक्यता आहे. हे नारायणपूर, सुकमा आणि विजापूरचे क्षेत्र आहे, जिथे डीआरजी सैनिकांनी धाडस दाखवले.

## मुंबई प्लेऑफमध्ये पोहोचणारी चौथी टीम: दिल्लीला ५९ रनने हरवले

प्रतिनिधी । मुंबई

मुंबई इंडियन्सने आयपीएल २०२५ च्या प्लेऑफमध्ये प्रवेश केला आहे. बुधवारी संघाने दिल्ली कॅपिटल्सचा ५० धावांनी पराभव केला. एमआय प्लेऑफमध्ये पोहोचणारा चौथा संघ बनला आहे. गुजरात, बंगळुरू आणि पंजाब आधीच प्लेऑफमध्ये पोहोचले आहेत.

वानखेडे स्टेडियमवर १८१ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करणाऱ्या दिल्ली संघाचा डाव १८.२ षटकांत १२१ धावांवर संपला. समीर रिझवीने सर्वाधिक ३९ धावा केल्या. जसप्रीत बुमराह आणि मिशेल सँटनर यांनी प्रत्येकी ३ विकेट घेतल्या.

नाणेफेक गमावल्यानंतर प्रथम फलंदाजी करणाऱ्या मुंबईने ५ विकेट गमावून १८० धावा



केल्या. सूर्यकुमार यादवने ७३ धावा केल्या. त्याने नमन धीरसोबत शेवटच्या १२ चेंडूत ४८ धावा जोडल्या. नमन ८ चेंडूत २४ धावा करत नाबाद राहिला. दिल्लीकडून मुकेश कुमारने २ विकेट घेतल्या.

# माजी आयएएस अधिकारी पूजा खेडकर यांना सर्वोच्च न्यायालयाकडून दिलासा

प्रतिनिधी । मुंबई

माजी आयएएस प्रशिक्षणार्थी अधिकारी पूजा खेडकर यांना सर्वोच्च न्यायालयाने अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे. पूजा खेडकर यांनी गेल्या वर्षी शारीरिक अपंगत्वाबद्दल खोटे बोलल्याचा, आडनाव बदलल्याचा आणि स्पर्धात्मक नागरी सेवा परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी मागासवर्गीय प्रमाणपत्र बनावट केल्याचा आरोप करण्यात आला होता.यानंतर त्यांचे नाव चर्चेत आले होते. पूजा खेडकर यांना अटकपूर्व जामीन मंजूर करण्यात आला आहे.



साक्षीदारांवर प्रभाव टाकण्यापासून किंवा रेकॉर्डवरील पुराव्यांशी छेडछाड करण्यापासून त्यांना इशारा देण्यात आला आहे.याव्यतिरिक्त, सर्वोच्च न्यायालयाने नोव्हेंबर २०२४ मध्ये दिल्ली उच्च न्यायालयाच्या जामीन नाकारण्याच्या आदेशावर कठोर प्रश्न उपस्थित केले. उच्च न्यायालयाने म्हटले होते की खेडकर यांच्या कृती, प्रथमदर्शनी, फसवणूक करण्याच्या उद्देशाने होत्या असे दिसते.

मंगळवारी दुपारी दिलेल्या निकालात, खेडकर यांनी तपास अधिकाऱ्यांना सहकार्य केले नाही या दिल्ली उच्च न्यायालयाच्या निष्कर्षाला सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला.उच्च न्यायालयाच्या आदेशाला आव्हान देण्यासाठी पूजा खेडकर यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती.

# सानप कुटुंबाला २ लाखांचा दिलासा – प्रधानमंत्री जीवन ज्योती योजनेतून मदतीचा हात

## प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनेंतर्गत मदतीचा धनादेश सुपूर्द; एसबीआय शाखाधिकारी राकेश शाही यांचे मोलाचे मार्गदर्शन

आष्टी (प्रतिनिधी)

दु:खद निधन पावलेल्या अंबिका नवनाथ सानप या दिव्यांग व्यक्तीच्या कुटुंबाला प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना अंतर्गत २ लाख रुपयांचा धनादेश प्रदान करून आर्थिक आधार देण्यात आला.या योजनेंतर्गत मिळणाऱ्या लाभासंदर्भात स्टेट बँक ऑफ इंडियाचे शाखाधिकारी श्री.राकेश शाही यांनी शेतकऱ्यांसह सर्वसामान्य नागरिकांना योजनांचा अधिकाधिक लाभ मिळावा यासाठी मोलाचे मार्गदर्शन केले.या कार्यक्रमात उपप्रबंधक शिवनाथ राऊत यांनी योजनांचे महत्त्व नमूद करत नागरिकांनी अशा योजनांमध्ये सहभागी व्हावे,असे आवाहन केले.फक्त ४३६/- वार्षिक हप्त्यावर उपलब्ध असलेल्या या विमा योजनेतून मिळालेली २,००,०००/- रक्कम सानप कुटुंबाच्या वडील व वारसदार नवनाथ सानप यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली.वितरण प्रक्रियेमध्ये इमरान पठाण,अभिजीत भोज आणि मोहसिन शेख यांचे विशेष योगदान राहिले.



कार्यक्रमाचे आयोजन बँकेने केले होते.चेक बँकेचे सन्माननीय ग्राहक आणि गवारे कलेक्शन चे मालक अंबादास गवारे यांच्या हस्ते देऊन बँकेने या शाखेत ग्राहकांना असलेले महत्व अधोरेखित केले.यावेळी आष्टी तालुक्यातील ज्येष्ठ पत्रकार अण्णासाहेब साबळे यांची उपस्थिती विशेष आकर्षण ठरली.या प्रसंगातून एक गोष्ट नमूद होते – विमा योजना ही केवळ कागदावरील योजना नसून,दुःखाच्या क्षणी कुटुंबासाठी आशेचा किरण ठरते.स्टेट बँक ही कायम लोकोपयोगी कार्य करण्यास पुढाकार घेत असते.आपण सामाजिक बांधिलकी जपण्यात आघाडीवर आहोत हे स्टेट बँकेने पुन्हा एकदा दाखवून दिले आहे.

# छगन भुजबळ यांच्या मंत्रिमंडळात निवडीचा धाराशिव येथे मोठा जल्लोष

## फटाक्यांची आतषबाजी, गुलालाची उधळण, पेढे वाटून केले निवडीचे स्वागत

धाराशिव (प्रतिनिधी)

महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळात ओबीसी नेते छगन भुजबळ यांची निवड झाल्याबद्दल धाराशिव येथे आज (दि.२०) महात्मा फुले समता परिषद व ओबीसी समाजाच्या वतीने मोठा जल्लोष करण्यात आला. श्री.भुजबळ यांनी मंत्री पदाची शपथ घेतल्याचे वृत्त धडकताच शहरातील महात्मा फुले चौकात ओबीसी समाजाच्या वतीने जोरदार घोषणा, फटाक्यांची आतषबाजी, गुलालाची उधळण, पेढे वाटून या निवडीचे स्वागत करण्यात आले.

यावेळी बोलताना महात्मा फुले समता परिषदेचे मराठवाडा अध्यक्ष आबासाहेब खोत म्हणाले की, महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात छगन भुजबळ यांनी मंत्री पदाची शपथ घेतली, हा दिवस तमाम ओबीसी बांधवांसाठी आनंदाचा दिवस आहे. ओबीसी समाजाच्या प्रश्नासाठी रात्रंदिवस झटणारे छगन भुजबळ यांना मंत्रिमंडळात पुन्हा संधी मिळाली याचा तमाम



ओबीसी बांधवांना अभिमान आहे. म्हणून धाराशिव जिल्ह्यात महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने आम्ही जल्लोष साजरा केल्याचे त्यांनी सांगितले.यावेळी महात्मा फुले महात्मा फुले समता परिषदेचे मराठवाडा अध्यक्ष आबासाहेब खोत, जिल्हाध्यक्ष बिभीषण खुणे, तालुकाध्यक्ष रॉबिन बगाडे, धाराशिव शहराध्यक्ष व्यंकट जाधव, कळंब तालुकाध्यक्ष प्रशांत वेदपाठक, शरणाप्पा घोडके, महादेव माळी, दत्ता कटारे, रामदास गायकवाड, सचिन मोरे, सचिन चौधरी, फयाज शेख, सुनील गवळी, लक्ष्मण वाघमारे, सुरेश लोकरे, नागेश चौधरी, नंदु कुर्हाडे यांच्यासह ओबीसी समाजबांधव मोठ्या संख्येने



पाटोदा - फयाज सय्यद

येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात अकरावी कला, वाणिज्य, विज्ञान व व्यावसायिक अभ्यासक्रम या वर्गांच्या प्रवेशाकरिता ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया २१ मे पासून सुरु करण्यात आली आहे.ऑनलाईन नोंदणी प्रक्रियेचे उद्घाटन प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. याप्रसंगी कमवि उपप्राचार्य प्रा. नामदेव चांगण, प्रवेश समितीचे प्रा. विठ्ठल शिंदे, डॉ. तानाजी आगळे, डॉ. मच्छिन्द्र शेळके, प्रा. सतीश कदम आदी उपस्थित होते.

इयत्ता अकरावीच्या प्रवेशासाठी २१ मे ते २८ मे हा अवधी देण्यात आलेला असून इच्छुक पालक व विद्यार्थ्यांनी २८ मे च्या आत नोंदणी करून घ्यावी असे आवाहन प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे यांनी केले आहे.

# खासगी शिकवणी नसूनही फक्त जिद्द ,मेहनतीच्या पंखानी यशाला गवसणी

प्रतिनिधी । कामठी

कामठी येथील सेंट जेनेली शाळेत सीबीएसई १० वि चे शिक्षण घेतलेल्या शगुण स्मिता आशिष मेश्राम नामक विद्यार्थिनीने खासगी शिकवणी नसून ही शालेय शिक्षणा च्या अभ्यासावर च जिद्द , मेहनतीच्या पंखानी यशाला गवसणी दिली व सीबीएसई १० वि च्या परिक्षेत ९४ टक्के गुण मिळवून कामठी तालुक्यात नेत्रदीपक यश संपादन केले. शगुण मेश्राम ने केवळ आपल्या शाळेसह कुटुंबियांसह संपूर्ण परिसराचे नाव मोठे केले.

एका केबल आपरेटर ची मुलगी असलेल्या शगुण ने आपल्या वडिलाचे मेहनतीची कार्यपद्धती खुप जवळून घेतल्याचा अनुभव आहे.सकाळपासून घरोघरी केबल सेवा देण्याचे काम करतात त्यांनी आपल्या कुटुंबासाठी अथक परिश्रम घेतले आहेत.शगुण ने आपल्या वडिलाचा हा संघर्ष खुप जवळून पाहिला आहे.वडिलाची कष्टाची जाणीव तिच्या बालमनावर खोलवर रुजली आहे.वडिला

च्या कष्टाला सार्थक करण्यासाठी



शगुण ने कुठलेही खासगी शिकवणी न घेता शाळेत मिळालेल्या शिक्षणावरच अभ्यासात कोणतीही कसर ठेवली नाही.शाळेतील शिक्षकांनीही तिच्यातील क्षमता ओळखून तिला नियमित मार्गदर्शन केले तसेच तिच्यात असलेल्या अष्टपैलू व्यक्तिमत्वाचा विकास करण्याचे सुद्धा मार्गदर्शन केले शगुण चे इतक्या कमी वयात इंग्रजी भाषेवर वचक असून वक्तृत्व शैली आहे.शगुण ने सांगितले की माझ्या आई वडिलांनी मला नेहमीच प्रेरणा दिली तसेच वडिलाच्या केबल आपरेटर च्या कष्टाकडे पाहून मला अधिक अभ्यास करण्याची ऊर्जा मिळत होती.मला माझ्या आई वडिलांसाठी काहीतरी करून दाखवायचे आहे.शगुण ला शास्त्रज्ञ व्हायचे आहे .शगुण ने अभ्यासाच्या आधारावरच यश खेचुन आणले आहे त्याबद्दल माजी नगराध्यक्ष गुड्डू मानवट कर, संदीप कांबळे, नागसेन सुखदेवें, दिपंकर गणवीर, सलमान अब्बास,कृष्णा पटेल,सुमित गेडाम,अनिल कुरील आदींनी गृहभेट देत आई वडीलासह शगुण चा सत्कार केला.

# खड्ड्यात झाडे लावत अमळनेर कॉंग्रेसने केले गांधीगिरी आंदोलन

प्रतिनिधी । जळगांव

अमळनेर पासूनचा राज्यमार्ग क्रमांक सहा हा बऱ्यापैकी रहदारीचा रस्ता आहे. कारण या रस्त्यावरून अमळनेर बस आकारातून बेटावद, नरडाणा, शिंदखेडा, दोंडाईचा अशा बऱ्याचशा लांब पल्ल्याच्या बसेस शहादापर्यंत जातात. तर गलवाडे, झाडी, भरवस, लोन पंचम, एक लहरे, शहापूर या गावातील, अनेक गावकऱ्यांचा, दुचाकी चार चाकी वर जाण्या येण्याचा हा रोजचा मार्ग आहे. परंतु या मार्गावर मुंदडा नगर२ च्या पुढे, श्री केले सरांच्या घराजवळ,वळणावर तीन महिन्यापासून एक मोठा खड्डा पडलेला आहे. आणि पाच-सहा दिवसाच्या वाळवा च्या तथा अवकाळी पावसामुळे खड्डा मोठा होत आहे. तेथे सर्व लहान मोठ्या वाहनांना चालविताना, चालकाला तारेवरची कसरत करावी लागते, कारण त्याच खड्ड्याजवळ रस्त्या च्या पश्चिमेला व पूर्वेला ९० डिग्री हा रस्ता वळतो. आणि खड्ड्यात पाणी साचल्याने, खड्ड्याचा खोलीच्या चालकांना अंदाज येत नाही. व त्यामुळे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. आम्ही कॉंग्रेस प्रेमींनी जागेवर वाहन चालकांना उभे करून, त्यांच्या व्यथा जाणून घेतल्या. फारच कडवट, तिखट शब्दात वाहन चालकांनी खड्ड्याबाबत त्यांच्या व्यथा मांडल्या. अशा सर्व प्रकारच्या जनतेच्या त्रासाचा, नुकसानीच्या गांभीर्याने अंदाज घेऊन, खड्डे त्वरित दुरुस्त व्हायला पाहिजे म्हणून, अमळनेर तालुका कॉंग्रेस कमिटीने गांधीगिरी करून, सदर रस्त्याच्या खड्ड्यात आज दिनांक १८ मे रोजी, रविवारी, सकाळी १०.०० वाजता वृक्षारोपण केले. तसेच मा. कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग अमळनेर यांना वास्तविकेचे निवेदन देखील देणार आहोत, की जेणेकरून अमळनेर



सार्वजनिक बांधकाम विभागाने, रस्त्याच्या कामाकडे तातडीने लक्ष दिले पाहिजे. सदरचा रस्ता हा दहा वर्षे ठेकेदाराने देखभाल करण्याच्या करारावर दिलेला आहे. तरी सार्वजनिक बांधकाम विभा गाने, ठेकेदाराकडून त्वरित सदर रस्त्याच्या खड्ड्याच्या दुरुस्तीचे काम करून घ्यावे. कारण पुढे सात जून पासून पावसाळा असल्याने खड्डयाचा विस्तार वाढायला वेळ लागणार नाही. सदर गांधीगिरी कार्यक्रमास तालुका कॉंग्रेस अध्यक्ष भागवत सूर्यवंशी, शहराध्यक्ष मनोज पाटील, संदीप घोरपडे, शरद पितांबर पाटील, गजेंद्र साळुंखे भागवत गुरुजी, के.व्ही. पाटील, प्रताप नागराज पाटील, दिलीप साहेबराव पाटील, पी. वाय. पाटील, तुषार संधान शिव, भगवान संधान शिव, विठ्ठल पवार, प्रमोद पाटील, राजू भाट, बापूराव पाटील, मोहम्मद तेली, मनोहर पाटील, विलास सिताराम पाटील.आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# वटकळी येथील शोले स्टाईल आंदोलन,लेखी आश्वासनानंतर मागे



सेनगाव / गणेश सुतार (दै. महाभारत)

सेनगाव तालुक्यातील वटकळी येथे जलजीवन योजने अंतर्गत करण्यात येत असलेल्या पाईपलाईन दुरुस्त करावी पाण्याच्या टाकीचे काम पूर्ण करावी पाईपलाईन व इतर कामे करणाऱ्या गुत्तेदारावर कारवाईक व इतर मागण्यासाठी ग्रामस्थांनी बुधवारी दि. २१ सकाळी पाण्याच्या टाकीवर जाऊन शोले स्टाईल आंदोलनाला सुरुवात झाली अधिकाऱ्यांनी लेखी आश्वासन दिल्यानंतर हे आंदोलन मागे घेण्यात आले.या आंदोलनाची माहिती मिळताच जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश यांनी तातडीने एक पथक वटकळीकडे रवाना केले तर पोलिसांचे पथकही गावात दाखल झाले आहे.

सेनगाव तालुक्यातील वटकळी हे गाव ५००० लोकसंख्येचे गाव असून गावात नळ पाणीपुरवठा योजनेचे काम करण्यात आले आहे नळ पाणीपुरवठा योजनेसाठी सुमारे तीन किलोमीटर अंतर असलेल्या दाताडा शिवारात विहीर घेण्यात आली आहे या विहिरीला कमी पाणी असतानाही जलवाहिन्या आथरण्याचे काम करण्यात आले आहे मात्र सदर काम अतिशय निकृष्ट दर्जाचे झाल्याचा आरोप गावकऱ्यांनी केला आहे केवळ अर्धा फूट खोलीवरच जलवाहिन्या अआथरण्यात आल्या असून शेतकऱ्यांनी नागरणी केल्यानंतर अनेक ठिकाणी जलवाहिन्या फुटल्या आहेत या कामाची चौकशी करण्याच्या मागणीसाठी गावकऱ्यांनी यापूर्वीही आंदोलन केले होते त्यावेळी पाणीपुरवठा विभागाच्या अभियंत्यांनी योजनेच्या कामाची चौकशी करण्याचे आश्वासन दिले होते शिवाय नळ योजनेची दुरुस्ती करून गावकऱ्यांना पाणीपुरवठा केला जाईल असे लेखी आश्वासन दिले होते मात्र चौकशीही झाली नाही अन नळ पाणीपुरवठा योजनेची दुरुस्ती हि झाली नसल्याचा आरोप गावकऱ्यांनी केला आहे. यामुळे गावात तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली आहे दरम्यान प्रशासनाने गावकऱ्यांना तातडीने पिण्याचे पाणी उपलब्ध करून द्यावे तसेच नळ पाणीपुरवठा योजनेच्या कामाची चौकशी करून दोषीवर कारवाई करावी या मागणीसाठी माजी सरपंच देवराव शिंदे, गणेश डाखुरे,भारत शिंदे, वामन डाखुरे, दिनेश उबाळे, वैभव उबाळे, राजू उबाळे,जगन लेकुळे,शेषराव शिंदे, केशव शिंदे,नागेश सुरकुटे, शुभम हानवते, गजानन ईटकर, सखाराम इटकर यांच्यासह आदी ग्रामस्थ आंदोलन स्थळी उपस्थित होते.

## बेधडक

### मान्सून पूर्व पाऊस...!

यावर्षी मान्सून पूर्व पाऊस
बऱ्यापैकी कोसळतो आहे,
कुठे नुकसान तर कुठे तो
जणू फायदा करतो आहे...!

बदलणाऱ्या ऋतूंची अशी
बदलणारी क्रिया आहे,
संपूर्ण जगभर वातावरण
बदलाची ही प्रक्रिया आहे...!!



–प्रा.एस खंडागळे
पाटोदा (बीड)
मो.९६५७२८४४४४

दैनिक जय महाभारत
संपादक - विजयकुमार वाव्हळ
हे पत्र, मुद्रक, प्रकाशक व मालक विजयकुमार सुखदेव वाव्हळ यांनी सुयोग ऑफसेट प्रिंटर्स येथे छापुन निर्मिती प्रिंटस् कबाड गल्ली, जुन्या पोलीस स्टेशन समोर, बीड ४३११२२ येथुन प्रकाशित केले.
संपादक – विजयकुमार वाव्हळ Mo.9028429999 / 9657299999 :: कार्यकारी संपादक ::प्रथमेश विजयकुमार वाव्हळ Mo.9075409999
RNI.NO.MAHMAR/2015/64418 मुख्य कार्यालय :- प्रथमेश गॅस एजन्सी, पहिला मजला गेवराई – बीड रोड गेवराई ता.गेवराई जि. बीड – ४३११२७
संपर्क -Mo.9403825700/94058 17999 jaymahabharat2015@gmail.com ✻ टीप : या अंकातील प्रसिध्द झालेल्या प्रत्येक बातमीशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# आर्थिकदृष्ट्या सजग राहणे ही काळाची गरज आहे प्रियदर्शिनी मुळे

इचलकरंजी / संभाजी गुरव
( दैनिक महाभारत)

आजच्या डिजिटल युगात आर्थिक व्यवहार आणि गुंतवणूक वगैरे करताना आपण सजग राहणे ही काळाची गरज आहे. कोणतीही गुंतवणूक करताना ती आपण मान्यताप्राप्त ठिकाणी करतो काय, वारस नोंद करतो काय, अशा गोष्टी महत्त्वाच्या आहेत. त्याचबरोबर आर्थिक व्यवहार करताना त्यामध्ये फसवणूक, सायबर फ्रॉड होऊ शकतो काय, प्रलोभन आहेत काय यांचे भान आपण ठेवले आहे काय अशा सर्व दृष्टीने सजग राहणे आवश्यक असते. कारण आपला कष्टाचा पैसा कोणत्याही प्रकारे वाया गेला तर आर्थिक नुकसानीबरोबरच मानसिक स्वास्थ्यही बिघडते. त्यामुळे काळजी घेणे गरजेचे आहे. अशा आशयाचे प्रतिपादन आर्थिक नियोजनकार व सेबी मान्यताप्राप्त गुंतवणूक सल्लागार सौ. प्रियदर्शिनी मुळ्ये, रत्नागिरी यांनी केले.

येथील मनोरंजन व प्रबोधन व्याख्यानमालेत नवव्या दिवशी 'उत्तम जगण्यासाठी आर्थिक नियोजन' या विषयावर त्या बोलत होत्या. सुरुवातीला किरण गॅस एजन्सीचे किरण बरगाले तसेच मुळ्ये आणि मनोरंजन मंडळ अध्यक्ष समीर गोवंडे, रोटरी क्लब सेंट्रल अध्यक्ष सतीश पाटील व सेक्रेटरी नागेश दिवटे यांनी शिव प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. श्री दगडूलाल मर्दा फाउंडेशनचे श्यामसुंदर मर्दा उपस्थित होते. यावेळी संयोजकांच्या हस्ते पाहुण्यांना पुस्तक व गुलाब पुष्प प्रदान करण्यात आले. सौ. शर्वरी गोवंडे यांनी प्रास्ताविक केले तर पद्माकर खोत यांनी वक्त्यांचा परिचय करून दिला.

आपल्या दृकश्राव्य पद्धतीने सादर केलेल्या माहितीपूर्ण भाषणात मुळ्ये यांनी एकूणच आर्थिक नियोजन करताना कोणत्या प्रकारे विचार करावा आणि काळजी घ्यावी याची तपशीलवार मांडणी केली. उत्तम आर्थिक जगण्यात आर्थिक स्थैर्य, मानसिक शांतता व स्वतंत्रता हे सर्व घटक येतात. पैसा हे साधन आहे उद्दिष्ट नव्हे याचेही भान आपण ठेवायला हवे, कारण पैशाच्या मागे लागण्यास कोणतीही सीमा नसते. जीवनातील ध्येय साध्य करण्यासाठी शिस्तबद्ध पद्धतीने पैसे हाताळणे म्हणजे आर्थिक नियोजन होय आणि आजच्या बदलत्या काळात याची खूप गरज आहे. कारण पूर्वीच्या काळी आपल्या उत्पन्नात स्थिरता होती, शिवाय वृत्ती खर्चिक नव्हती तसेच बाह्य प्रलोभने कमी होती. आज बाजारवादाच्या जगात उत्पन्नाचे स्त्रोत वाढले त्याचबरोबर खर्चही वाढले आणि अनेक प्रलोभने आपल्या समोर येत आहेत. त्यामुळे काळजी घेणे आवश्यक आहे.असे त्या म्हणाल्या.

आपल्या जगण्यासाठी उपयुक्त सल्ला देताना मुळे यांनी सांगितले की आर्थिक नियोजन करताना आपत्कालीन निधी, विमा आणि उद्दिष्ट आधारित नियोजन महत्त्वाचे आहे. आज उत्पन्न वाढले, पगार वाढला तर आधी स्वतःची कार, जागा घेणे या गोष्टीकडे लोकांचा कल असतो. पण उद्या काय होईल याची खात्री नसलेल्या जगात आधी पुरेशा आपत्कालीन निधीची व्यवस्था आपण करायला हवी. दरमहा होणारा खर्च लक्षात घेऊन एक वर्ष पुरेल इतका निधी ठेवणे आवश्यक आहे आणि त्यासाठी नियमित बचतीची गरज आहे. विमा हा घटक देखील महत्त्वाचा असून लोकांनी टर्म लाइफ इन्शुरन्स आणि हेल्थ इन्शुरन्स घेणे गरजेचे आहे. याबरोबरच उद्दिष्ट आधारित आर्थिक नियोजन करावे म्हणजे मुलांचे शिक्षण, कौटुंबिक गरजा इत्यादी जबाबदाऱ्या आणि त्यानंतर आपल्या इच्छा व अपेक्षा याचे भान ठेवून लोकांनी शॉर्ट टर्म, मिडीयम आणि लॉन्ग टर्म गुंतवणूक ठरवावी.

आपल्या भाषणात मुळे यांनी आर्थिक व्यवस्थापन करताना कोणत्या गोष्टी पाळायच्या आणि कोणत्या टाळायच्या याची उत्तम माहिती दिली. स्वतःचा आर्थिक स्वभाव ओळखून आपले बजेट तयार करावे आणि ऐच्छिक खर्चाचे भान ठेवावे. कुटुंबातील सर्वांबरोबर आर्थिक चर्चा करावी आणि त्यांनाही सजग करावे. त्याचबरोबर इतरांशी विनाकारण स्वतःची तुलना करू नये. लवकर फायदा मिळवून देणाऱ्या योजनांच्या पासून दूर राहावे तसेच अनावश्यक कर्ज घेण्याबाबत सावध राहावे. महत्त्वाचे म्हणजे आर्थिक नियोजनाचे व्यवस्थापन लांबणीवर टाकू नये, वेळेवर करावे अशा आशयाचा सल्ला त्यांनी दिला. येथील श्रीमंत घोरपडे नाट्यगृहात झालेल्या कार्यक्रमास, पाऊस असतानाही रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दारूमुक्त खारघरसाठी निर्धार




नवी मुंबई :(संतोष वाव्हळ)

खारघर शहर दारूमुक्त व्हावे, यासाठी सहयोग सेवाभावी संस्था आणि खारघरमधील नागरिकांच्या वतीने जनआंदोलन उभारण्यात आले आहे. या आंदोलनाच्या अंतर्गत रविवारी खारघरमध्ये सांकेतिक उपोषण करण्यात आले. या उपोषणाला आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देऊन आंदोलकांशी संवाद साधला आणि दारूमुक्त खारघरसाठी प्रयत्नशील राहण्याचा निर्धार व्यक्त केला.

राज्य शासनाने खारघर शहर दारूमुक्त घोषित करावे, यासाठी संघर्ष समिती गेल्या अनेक वर्षांपासून प्रयत्नशील आहे. २००७ पासून मोर्चे, आंदोलने आणि शासनाकडे पत्रव्यवहार समितीने केले आहेत. याच मागणीसाठी १८ मे रोजी खारघरमधील शिल्प चौकात एकदिवसीय सांकेतिक उपोषण आयोजित करण्यात आले होते, ज्याला खारघरवासियांचा चांगला प्रतिसाद मिळाला. या आंदोलनात सर्वपक्षीय कार्यकर्ते आणि सामान्य नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. खारघर शहराला दारूमुक्त करण्याची मागणी येथील नागरिक मागील दोन दशकांपासून करत आहेत. मात्र, उत्पादन शुल्क विभाग लोकांच्या हिताकडे दुर्लक्ष करून दारू विक्रीचे परवाने वाटप करत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. यावेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, खारघर मंडळ अध्यक्ष प्रवीण पाटील, माजी नगरसेवक अभिमन्यू पाटील, ॲड. नरेश ठाकूर, कीर्ती नवघरे, वासुदेव पाटील, समीर कदम, युवा मोर्चा अध्यक्ष नितेश पाटील, अमर उपाध्याय, यांच्यासह पदाधिकारी मान्यवर उपस्थित होते.

# 'पुस्तकाचे घर'(ग्रंथसहवास) तर्फे गुणवंत हर्षल विखारचा गौरव




ब्रह्मपुरी/ प्रतिनिधी
(दै.महाभारत)

ब्रह्मपुरीतील प्रसिद्ध कवी,लेखक व पत्रकार डॉ. धनराज खानोरकर यांचे कुर्झा वार्डातील ' पुस्तकाचे घरा'(ग्रंथसहवास )तर्फे विशेष गौरव कार्यक्रम पार पडला.नुकताच घोषित झालेल्या दहावी शालांत परीक्षा निकालात नेवजाबाई हितकारिणी हायस्कुलचा कुर्झा वार्डातील हर्षल मोरेश्वर विखार याला ९० टक्के गुण प्राप्त झाले.त्याचा मान्यवराच्या हस्ते यथोचित विशेष गौरव करण्यात आला.

हर्षलने कोणतीही शिकवणी न लावता मेहनतीने हे यश संपादन केले. 'पुस्तकाचे घरा'चे संचालन डॉ. धनराज खानोरकर, नगरपालिका माजी बांधकाम सभापती विलास विखार,डॉ. बबन राऊत,सुखदेव खेत्रे,सागर घोरमोडे यावेळी उपस्थित होते.

# विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात भावी पिढीला चांगले विचार व सुसंस्काराची गरज

## पुस्तकाची आई भिमाबाई जोंधळे यांचे आदर्श माता सन्मान सोहळ्यात प्रतिपादन




निफाड ।रामभाऊ आवारे
( दै. महाभारत )

समाजातील ज्येष्ठांचा मानसन्मान करणे ही भारतीय संस्कृती असुन विज्ञान व तंत्रज्ञानाच्या युगामध्ये बिकट होत चाललेल्या परिस्थितीत कुटुंबव्यवस्था ढासळत असताना खऱ्या अर्थाने विचार आणि संस्कारांची गरज आजच्या पिढीला आहे, असे प्रतिपादन पुस्तकांची आई भीमाबाई जोंधळे यांनी केले. गिरणा गौरव प्रतिष्ठान संचलित महाराष्ट्र राज्य गिरजा महिला मंचच्या वतीने हुतात्मा स्मारकात मातृदिनानिमित्त जिल्ह्यातील आदर्श मातांच्या सन्मान सोहळ्याप्रसंगी त्या बोलत होत्या. कार्यक्रमाचे अध्यक्ष साने गुरुजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष प्रवीण जोशी, हुतात्मा स्मारक समितीचे सदस्य विजय राऊत, गिरजा महिला मंचच्या राष्ट्रीय अध्यक्षा प्रतिभा म्हस्के,गिरणा महिला मंच नाशिक जिल्हाध्यक्ष मंडल अधिकारी कु शितल कुयटे, उपाध्यक्ष भाग्यश्री चौधरी आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते. भीमाबाई जोंधळे पुढे म्हणाल्या की, समाजातील पिढीला आदर्श देण्यासाठी आई-वडील यांनीही मुलांकडे लक्ष दिले पाहिजे. एक पुस्तक हजारो मस्तके घडवत असते. त्यासाठी आपण पुस्तके वाचली पाहिजेत, असा संदेश ही त्यांनी दिला.

कार्यक्रम अध्यक्ष प्रवीण जोशी, विजय राऊत, शितल कुयटे यांनी मनोगत व्यक्त केले.प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन सरला जगन्नाथ चव्हाण (येवला),अनाथ व वृद्धांची माय गोसेविका भागवताचार्य हभप संगीता माई गुंजाळ (निफाड),सविता संतोष चव्हाण / दिवटे (चांदवड), अलका सुरेश निकम (मालेगाव), भीमाबाई शिंदे (दिंडोरी), सुशीला बाबूलाल महाजन (कळवण), सुमित्रा रामदास राऊत (त्र्यंबकेश्वर), गंगाबाई सखाराम थवील (सुरगाणा), जिजाबाई दोधा मोरे (सटाणा), चित्राताई शेवाळे (देवळा), मंदा वसंतराव अत्रे (नांदगाव), मथुरा रामभाऊ वारुंगसे (इगतपुरी), वीरमाता भारती भालेराव (नाशिक), काशीबाई तुकाराम भरसट (पेठ), प्रभावती विश्वनाथ भावसार (सिन्नर), वीरमाता बबूबाई ढाकणे (तळेगाव दिंडोरी), वीरमाता कृष्णाबाई बोडके (नाशिक) या आदर्श मातांचा सन्मान करण्यात आला. भाग्यश्री चौधरी प्रास्ताविक केले. कांचन माला हुजरे यांनी सूत्रसंचालन तर माधुरी भावनाथ यांनी आभार मानले. शितल चव्हाण, पूजा दंडगव्हाळ, अलका दराडे, वैशाली सोनवणे, हर्षाली भोसले, आशा गोवर्धने, वंदना गांगुर्डे, सविता दरेकर, सुशीला संकलेचा, माधुरी अमृतकर, रूपाली पवार यांसह गिरजा महिला मंचच्या सदस्या आणि सन्मानार्थी मातांच्या कुटुंबातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. काव्यवाचन स्पर्धेत संध्या रजनी सावकार प्रथम पहिल्या सत्रात 'काळजातील आई' या विषयावर संपन्न झालेल्या काव्यवाचन स्पर्धेत राज्यभरातील ४५ कवयित्रींनी सहभाग घेतला. प्रथम- संध्या रजनी सावकार, द्वितीय- कालिंदी वाणी (ठाकुर्ली,डोंबिवली), तृतीय-सुशीला संकलेचा, उत्तेजनार्थ-अर्चना परदेशी या पारितोषिक प्राप्त स्पर्धकांना रोख पारितोषिके प्रदान करण्यात आली. ज्येष्ठ साहित्यिका अलका दराडे यांनी परीक्षण केले. कवयित्री आशा गोवर्धने यांनी सूत्रसंचालन तर माधुरी अमृतकर यांनी आभार मानले.


# आधी जिल्हा परिषद व नंतर नगरपरिषद निवडणुका

## ऑगस्टमध्ये जिल्हा परिषद तर सप्टेंबर सप्टेंबरमध्ये नगरपरिषद निवडणुका

अंबाजोगाई / सालेम पठाण
(दै.महाभारत)

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका येत्या चार महिन्यात घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिल्यानंतर राज्य निवडणूक आयोग व राज्य सरकार मोठ्या जोमाने कामाला लागले आहे. राज्य सरकारने तात्काळ प्रत्येक जिल्ह्यातील लोकसंख्येची अचूक माहिती पाठवण्याचे आदेशित केले आहे. सद्यस्थितीला जिल्हा परिषद व पंचायत समित्या निवडणुका प्रथम टप्प्यात घेतल्या जातील .नंतरच्या टप्प्यात नगरपरिषदा आणि महापालिका निवडणुका होतील असा अंदाज वर्तवण्यात येत आहे.साधारणता जिल्हा परिषद निवडणूक ऑगस्टमध्ये तर नगरपालिका निवडणुका सप्टेंबर मध्ये होतील असा अंदाज व्यक्त करण्यात येतो आहे.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका गेल्या सात ते आठ वर्षापासून झालेल्या नाहीत. प्रशासकराज सुरू असून प्रशासनाची मोठ्या प्रमाणात मनमानी सुरू आहे. लोकसभा व विधानसभा निवडणुका निर्विघ्नपणे पार पडल्या. आता सारं काही सुरळीत झाले आहे. राज्यात महायुतीची सत्ता आली. सर्वोच्च न्यायालयाने आजवर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी तारीख पे तारीख दिलेली होती मात्र ७ मे २०२५ रोजी तातडीने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घ्या असा आदेश दिला. ओबीसी आरक्षणासह निवडणुका घ्या असे आदेशित केलेले आहे,न्यायालयीन प्रकरणे सुरूच राहतील ते निकालानंतर पाहू असे आदेशित करून निवडणुकांचा मार्ग मोकळा करून दिला. त्यानुसार आता राज्य निवडणूक आयोग आणि राज्य सरकार कामाला लागले आहे. राज्यातील जिल्हा परिषद कक्षेतील जिल्ह्याची अचूक संख्या व लोकसंख्या पाठवावी तसेच जिल्हा परिषद सदस्य संख्या निश्चितीसाठी लोकसंख्या गरजेची आहे ही अचूक लोकसंख्या राज्य सरकारला पाठवली जाईल आणि त्यानंतर जिल्हा परिषदांच्या गटांमध्ये व पंचायत समितीच्या गणामध्ये वाढ होणार आहे. त्या अनुषंगाने राज्य सरकारने जिल्हाधिकारी यांच्याकडे ही माहिती मागवली आहे. राज्य सरकार आणि विशेषतः महायुती सरकार पहिल्या टप्प्यात जिल्हा परिषदेच्या निवडणुका घेतील असे दिसते आहे. कारण महायुतीला मानणारा मतदार हा ग्रामीण महाराष्ट्रात आहे. शिवाय ग्रामीण भागात मुस्लिम मतदार हा नगण्य आहे.जिल्हा परिषद निवडणुकीत महायुतीने बाजी मारली की पुन्हा नगरपरिषद निवडणुका घेतल्या जातील. जिल्हा परिषद निवडणुकीत मिळालेल्या यशावरच नगरपालिका व महापालिका जिंकण्याचा महायुतीचा प्रयत्न असणार आहे. जिल्हा परिषदेतील वातावरण नगरपालिका निवडणुकीत टिकून ठेवण्यासाठी महत्त्वाचे मानले जाते. या निवडणुकीत महायुती व महाविकास आघाडी एकसंघ लढणार नाही.




कारण भाजपा व काँग्रेस हेच एकमेव पक्ष अभ्याध आहेत बाकी शिवसेना व राष्ट्रवादी यांची शकले पडलेली आहेत.दोन्ही राष्ट्रवादी व दोन्ही शिवसेना एकमेकांची मते खाऊन एकमेकांना संपवतील आणि विना त्रास भाजपचा गड जिंकलेला असेल. भाजपाच्या स्वतःच्या जास्त जागा आणि जास्त जिल्हा परिषद येतील. त्याला शिवसेना व राष्ट्रवादीची मदत होईल. मनसे,रिपाई,वंचित बसपा व इतर पक्ष मत विभागणीचे काम प्रामाणिकपणे पार पडतील. जिल्हा परिषद,नगरपालिका व महापालिका निवडणुकीत भाजपा सर्वाधिक ' पॉवरफुल ' पक्ष राहील असे दिसते आहे. म्हणून अगोदर जिल्हा परिषद व पंचायत समिती यांच्या निवडणुका घेऊन विजयाचा झेंडा फडकवण्याचा भाजपचा मानस आहे.त्या अनुषंगाने राज्य सरकार व निवडणूक आयोग कामाला लागला आहे .राज्य सरकारचे ग्रामविकास खाते हे जिल्हा परिषद गट निर्मिती, पंचायत समिती गण निर्मिती, रचना, आरक्षण आणि मतदार यादी स्क्रूटनी कार्यक्रम घेईल. त्यानंतर निवडणुका निवडणूक आयोगाला माहिती पाठवून निवडणूक कार्यक्रम घोषित करण्यात येईल. नगरपालिका व महापालिकेच्या बाबतीत राज्य सरकारने आजच्या स्थितीला काही एक पाऊल उचललेले नाही. सध्या तरी प्राथमिक टप्प्यात जिल्हा परिषद निवडणूक होतील असेच दिसते आहे.साधारणता ऑगस्टमध्ये जिल्हा परिषदा, तर सप्टेंबरमध्ये नगरपालिका निवडणूक होतील असे दिसते आहे.

# साहित्यिक राजेंद्र पारे जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित




चोपडा / महेश शिरसाठ
(दै.महाभारत)

समता उत्कर्ष समिती शिरपूर जिल्हा धुळे आयोजित 'काकासाहेब बैसाणे जीवन गौरव पुरस्कार २०२५' मोठया सन्मानाने चोपडा येथील साहित्यिक राजेंद्र पारे यांना साहित्य क्षेत्रातील योगदानाबद्दल प्रदान करण्यात आला. राजेंद्र पारे हे जिप शाळा गणपूर येथे कार्यरत आहेत. त्यांना राज्यशासनाचा शिक्षक पुरस्कार मिळाला असून त्यांचे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर,मागचं दार, ठिगळ अन् टाके,बुद्धा इज स्माईलिंग,निब्बान, धावपट्टीवरचा अनोखा प्रवास,आपलं संविधान आपला सन्मान इत्यादी साहित्य प्रकाशित आहे. ''आकांक्षा' ही कथा कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव येथे बी.ए.प्रथम वर्ष अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आली आहे.

सिटी प्राईड उत्सवच्या सभागृह शिरपूर येथे आयोजित कार्यक्रमात डॉ. तुषार बैसाणे लिखित बाप माय पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. तसेच गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.कार्यक्रमात भाऊसाहेब डॉ. तुषार रंधे, आशाताई रंधे, पिंटूभाऊ शिरसाठ, भदंत आनंद, डॉ. दीपाली सोसे, डॉ. माधवराव कदम, युवराज माळी, डॉ. फुला बागूल, डॉ. सतीश मस्के, प्राचार्य सारिकाताई रंधे, आशाताई बैसाणे उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी डॉ. तुषार बैसाणे,नगरसेवक पिंटू शिरसाठ, किसान विद्या प्रसारक संस्थेचे सचिव निशांत रंधे, संस्थेचे खजिनदार आशाताई रंधे, आशाताई बैसाणे, पनीराज बैसाणे, संजय जाधव, जितेंद्र भदाणे, यांनी मेहनत घेतली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्वाला मोरे तर आभार पनीराज बैसाणे यांनी मानले.

# काँग्रेसच्या वतीने बीड मध्ये तिरंगा रॅली संपन्न !

## मोटार सायकल रॅली काढून सैनिकांच्या प्रति काँग्रेसने दाखवली सद्भावना

बीड / प्रतिनिधी
(दै.महाभारत)

पाकिस्तानच्या सततच्या भ्याड हल्ल्याला भारतीय सैन्याने मोठ्या ताकतीने उत्तर देत पाकिस्तानला चार दिवसांत गुडघे टेकायला लावले व भारतीय सैन्याने मिळवलेला हा विजय केवळ सैन्याचा आहे म्हणून भारतीय सैन्याला सलाम करण्यासाठी व भारतीयांची असलेली संवेदना हिच खरी देशभक्ती असून या वीरांच्या पराक्रमाला वंदन करण्यासाठीच काँग्रेस पक्षाच्या वतीने तिरंगा रॅली चे आयोजन करण्यात आले होते.

बीड येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार घालून या रॅलीची सुरुवात काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आली. या रॅलीमध्ये शहरातील आंबेडकर चौक, अण्णाभाऊ साठे चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, जिल्हाधिकारी कार्यालय समोरून जिल्हा काँग्रेस कमिटीचे कार्यालयात शहीद जवानाच्या प्रति संवेदना व केलेल्या शौर्याला सलाम व्यक्त करत या रॅलीचा समारोप करण्यात आला.




यावेळी जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे, प्रवीणकुमार शेप, गणेश बजगुडे, श्रीनिवास बेदरे, परवेज कुरेशी, संभाजी जाधव, गणेश राउत, विष्णू मस्के, प्रकाश मुंडे, पांडुरंग मस्के, दादासाहेब तासतोडे, राहुल जाधव, ड. विशाल मस्के, रमधन जमाले, मोसिन शेख, गणेश जवकर, कल्याण टेकाळे, हनुमंत घोडके, शेख कादर बाबा, उत्तरेश्वर जाधव, बबलू भाई शेख, रोहित नवले, राम शेळके, हरिभाऊ सावंत, पांडुरंग हराळे, सखाराम बेंडगे, रंजीत शेळके, अमजत कुरेश, शेख मुस्ताक, बाळू गिराम यांच्यासह या रॅलीत बीड शहर मंचचे नितीन जायभाये, बाजीराव ढाकणे, डॉ. संजय तांदळे, अड. नितीन वाघमारे यांनी देखील उपस्थित राहून भारतीय सैनिकांप्रती आपल्या संवेदना दर्शवल्या.

स्व. राजीव गांधी यांना अभिवादन...!

आज भारताचे माजी पंतप्रधान व भारतरत्न स्व राजीव गांधी यांचा स्मृतिदिन असल्याने जिल्हा काँग्रेस कमिटीच्या कार्यालयात त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले यावेळी जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष राहुल सोनवणे

# अल्पवयीन आदिवासी समाजातील मुलीला पळवुन नेणारा संशयित आरोपीस अटक करा

## अत्याचार विरोधी कृती समितीच्या कार्यकर्त्यांची जिल्हाधिकारी कार्यालयावर निदर्शने

नाशिक / शांतारामभाऊ दुनबळे
(दै महाभारत)

नाशिक-: त्र्यंबकेश्वर तालुक्यातील बोरीचा पाडा येथील अल्पवयीन आदिवासी समाजातील मुलीला जबरदस्तीने पळवुन नेणारा संशयित आरोपी वर पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात यावा आदिवासी अज्ञान मुलीचे अपहरण व बळजबरीने लैंगिक अत्याचार करणाऱ्या फरार (शिवा परदेशी नामक) आरोपीला तात्काळ अटक करा.अत्याचार विरोधी कृती समिती जिल्हाधिकारी नाशिक यांचेकडे मागणी, अन्यथा आंदोलनाचा ईशारा देण्यात आला आहे हरसूल पो. स्टे.मधील गुन्हा र. नं. १/२०२५ नुसार आरोपी शिवा परदेशी याने बोरीचा पाडा येथील १७ वर्षीय अज्ञान आदिवासी मुलीच बळजबरीने अपहरण केले आहे. आरोपीने गेल्या ५ महिन्यांपासून अज्ञान मुलीसोबत लैंगिक अत्याचार करून तीचे सर्वांगाने शोषण केले असल्याची फिर्याद पिडीतेचे वडील नामदेव किसन चिखले यांनी




हरसूल पो. स्टे. मध्ये दिली आहे. वारंवार पो. स्टे. ला चकरा , हेलपाटे मारूनही आरोपीला अटक झालेली नाही. यानंतर तक्रारदाराने मा. पोलीस अधीक्षक, नाशिक (ग्रा) तसेच महिला सुरक्षा विभाग, नाशिक (ग्रा) पोलीस, सायबर सेल गुन्हे नाशिक ग्रामीण शाखा, मा. जिल्हाधिकारी नाशिक यांची प्रत्यक्ष भेट घेऊन निवेदन दिले आहे. त्यानंतर राष्ट्रीय मानवाधिकार यांचेकडे ऑनलाईन तक्रार नोंदवली आहे.परंतु पोलीसांनी आरोपीच्या भावाबरोबर अर्थपूर्ण देवाण-घेवाणीतून आरोपीला मोकाट सोडलेले आहे. हि बाब अतिशय गंभीर असून *अत्याचार विरोधी कृती समितीच्या वतीने मा. जिल्हाधिकारी नाशिक यांची भेट घेऊन आरोपीला तात्काळ अटक करावी. आरोपीच्या विरोधात पोक्सो तसेच अनु. जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये (ट्रोसिटी) अन्वये गुन्ह्याची नोंद करून आरोपीला कठोर शिक्षेची मागणी केलेली आहे. तसेच याप्रकरणी पोलीस प्रशासनाने आरोपीला मदत केली असल्याने त्यांनाही सह आरोपी करून संबंधित पोलीसांना सेवेतून कायमचे बडतर्फ करण्याची मागणी केली आहे...अन्यथा उग्र स्वरूपाचे आंदोलनाचा ईशारा निवेदनाद्वारे दिलेला आहे. यावेळी मा.जिल्हाधिकारी या प्रकरणी विशेष लक्ष घालून आरोपीला तात्काळ अटक करण्यात येईल असे आश्वासन दिले आहे. निवेदनावर समितीचे मुख्य निमंत्रक : ॲड. राहूल विष्णू तूपलोंढे, ॲड. निलेश सोनवणे, दिलीप लिंगायत, रोहिणी जाधव, गणेश रणधीर, मंगल भांगरे,रावजी साप्ते,चंदर साप्ते, जिजाबाई निंबारी,हरी अर्जून भोये,रामदास पांडू भोये, शांताबाई साप्ते, ताराबाई साप्ते, पारीबाई चंदर साप्ते, रामदास चिखले,

## आता मनसे राबवणार रोषणपुरी ते छोटेवाडी रस्त्याचे मजबुतीकरण होईपर्यंत उपोषण मोहीम -धोंडीराम जाधव

माजलगाव : अमर साळवे
( दै. महाभारत )

दि.३०ऑगस्ट २०२४ रोजी नॅशनल हायवे रोषणपुरी फाटा या ठिकाणी या रस्त्या संदर्भात रस्ता रोको आंदोलन करण्यात आलेले होते. त्यावेळी त्यांनी संबंधित कार्यालयाने लेखी आश्वासन दिले होते की, पाऊस संपताच आम्ही या रस्त्याचे मजबुतीकरण करुन देऊत.मात्र या गोष्टी चा संमधीत विभागाला पुर्णतः विसर पडला आहे त्यांनी

आजतागायत त्या रस्त्यावर कुठल्याही प्रकारचे काम केलेले नाही. पाऊस पडल्यानंतर त्या रस्त्याने जाता येत नाही व शेतीची मशागत करता येत नाही. (शेतकऱ्यांना वाहने नेता येत नाहीत. बैलगाडीपण जात नाही. खत, बियाणे नेता येत जलगाव एवढेच नाही तर पायी पण त्या रस्त्याने जाता येत नाही. आशी आवस्था त्या म.म ज. याची होते. यासाठी आम्ही संबंधित कार्यालयात कळविलेले आहे व आंदोलनही केलेले आहे. तरी या रस्त्याकडे दुर्लक्ष होत आसल्यामुळे सर्व शेतकऱ्यासह महाराष्ट्र नवनिर्माण सेनचे महाराष्ट्र सैनिक हे दि.२३ मे २०२५ रोजी बुवाजीबुवा महाराज यांच्या पादुका या ठिकाणी मनसे स्टाईल उपोषण करणार आहोत. तरी यात काही अनुचित प्रकार घडल्यास याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित कार्यालयावर राहील.असे




दिलेल्या निवेदनात म्हंटले आहे निवेदना वर धोंडीराम जाधव ,गणेश वाघमारे ,आत्माराम ढिसळे,पांडुरंग जाधव,कैलास जाधव ,नितीन गावडे ,अशोक आगे आदी सह सुमारे पन्नास ते साठ जणांच्या साह्या आहेत.

# मुस्लिम सेवा संघ तर्फे गुणवंत विद्यार्थि यांचा सत्कार

मोहम्मद शारेक / दै महाभारत हिंगोली

कळमनुरी:- येथे मुस्लिम सेवा संघ तर्फे सोमवार १९ मे रोजी १२वी व १०वी च्या परिक्षेतील गुणवंत विद्यार्थियांचा सत्कार शहरातील गुलाम नबी आजाद उर्दु शाळेत एका कार्यक्रमाचा आयोजन करुन करण्यात आला काही दिवसांपुर्वी आलेल्या दहावी बारावी च्या निकाला मध्ये अनेक विद्यार्थियांना घवघवीत यश संपादन केले चांगले नंबर घेऊन यश प्राप्त करणार्यांचा सत्कार सदरील कार्यक्रमात करण्यात आला या कार्यक्रमात एकुण ४५ विद्यार्थी उपस्थित होते तसेच मान्यवरांसह पालकांची ही उपस्थिती होती मान्यवरांचे हसते यश प्राप्त करणार्या विद्यार्थियांचा सत्कार करुण सन्मान चिन्ह ही देण्यात आले या वेळी माजी उपनगराध्यक्ष मोहम्मद नाजीम रजवी, अय्युब पठाण, चंद्रकांत देशमुख, अशोक वाढवे, एड ईल्यास नाईक, राम भाऊ कोळपे, मोहम्मद परवेज, एड जे आर जाधव, संजय वाढवे, सय्यद अतहर अली, अफजल रहमान, सह आदी मान्यवर



उपस्थित होते कार्यक्रमाचे आयोजन व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुस्लिम सेवा संघाचे जिल्हा अध्यक्ष शेख आमेर, जिल्हा सल्लागार ऐड. अरशद नाईक, जिल्हा सचिव मुजीब पठाण, जिल्हा उपाध्यक्ष शेख अय्युब, युवा जिल्हा अध्यक्ष ऐजाज बागबान, तालुका अध्यक्ष मोहम्मद रफीक, सह आदींनी परिश्रम घेतले

जयेश जाधव व अलीजा शफक यांचा कौतुक करुण सत्कार कळमनुरी शहरातील महात्मा ज्योतीबा फुले येथील विद्यार्थी जयेश जगन कुमार जाधव यांनी दहावी च्या परिक्षेत १००% गुण मिळवुन घवघवीत यश संपादन केले असुन जयेश जाधव याचा विशेष सत्कार करण्यात आला तसेच शहरातील कैंब्रीज स्कुल आफ स्कॉलर या शाळेतील विद्यार्थिनी अलीजा शफक सय्यद अतहर अली यांनी ९७.४०% गुण प्राप्त करुन घवघवीत यश प्राप्त केले अलीजा शफक च्या या यशा बद्दल त्याचा ही मान्यवरांचे हसते विशेष सत्कार करण्यात आला

# बीड जिल्हातील शेतकरी व शास्त्रज्ञ यांची राष्ट्रीय नैसर्गिक शेती मिशन आभियान प्रशिक्षणा साठी निवड

अंबाजोगाई / सालेम पठाण
( दै.महभारत)

ता अंबाजोगाई देवळा येथील प्रगोगशील शेतकरी रविंद्र भानुदास देवरवाडे देवळा, कृषी विज्ञान केंद्र डिघोळ अंबा युनिट क्रमांक१बीड महाराष्ट्र शासन कृषी पुरस्कार प्राप्त शेतकरी, व श्री रामप्रसाद डोईफोडे इट कृषी विज्ञान केंद्र युनिट २बीड खामगाव यांची फार्मर मास्टर ट्रेनर म्हूणन निवड व कृषी विज्ञान केंद्र डिघोळ अंबा येथील वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ नरेंद्र अंगदराव जोशी यांची सब्जेक्ट मास्टर स्पेशलिस्ट म्हूणन निवड करण्यात आली आहे. राज्यात राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान योजना राबविण्यात येणार आहे. या योजनेंतर्गत प्रत्येक ग्रामपंचायत स्तरावर नैसर्गिक शेती गट कार्यान्वित करण्यात येणार आहेत.

नैसर्गिक शेती प्रोत्साहन अभियानाला सुरवात

महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान योजना राबविण्यात येणार आहे. या योजनेंतर्गत प्रत्येक ग्रामपंचायत स्तरावर नैसर्गिक शेती गट कार्यान्वित करण्यात येणार आहेत.राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान अंमलबजावणीसाठी शेतकरी प्रशिक्षण व कृषी सखी प्रशिक्षण आयोजित करण्यासाठी तसेच नैसर्गिक शेती मॉडेल प्रात्यक्षिक फार्म विकसित करण्यासाठी प्रशिक्षण संस्थांना केंद्र शासनाकडून १०० टक्के निधी प्राप्त होणार आहे.

दरम्यान, नैसर्गिक पद्धतीवर आधारित स्थानिक पशुधन शेती पद्धती लोकप्रिय करणे, जमिनीचा पोत सुधारणे, बाहेरून निविष्ठा खरेदी कमी करून शेतावरच आवश्यक निविष्ठा निर्मिती करणे व त्याचा वापर वाढवणे.शेतमाल उत्पादनासाठीचा खर्च कमी करणे आणि सहभागी शेतकऱ्यांच्या शेतीचे नैसर्गिक शेती प्रमाणीकरण करणे ही या अभियानाची प्रमुख उद्दिष्टे असल्याचे कृषी विभागाने सांगितले.कृषी सखींची निवड करण्यात येणारअभियानात सहभागी होण्यासाठी इच्छुक ग्रामपंचायतींनी त्यांच्या तालुका संनियंत्रण समिती अध्यक्ष व तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे त्यांच्या ग्रामपंचायतीच्या सहमतीचा प्रस्ताव कळवावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

नैसर्गिक शेतीसाठी कोणाशी संपर्क साधाल?ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रातून इच्छुक शेतकऱ्यांना एका एकर क्षेत्रासाठी या अभियानात सहभागी करून घेतले जाईल. ज्या शेतकऱ्यांना नैसर्गिक शेती अभियानात सहभागी व्हायचं आहे त्या शेतकऱ्यांना जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालय, जिल्हा परिषद कृषी विभाग, तालुका कृषी कार्यालय किंवा जिल्हाधिकारी कार्यालयात संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

ग्रामपंचायतींचा सहभाग महत्त्वपूर्ण आहे. या अभियानाची धुरा ग्रामपंचायतींच्या खांद्यावर राहणार आहे. त्यामुळे जास्तीत जास्त ग्रामपंचायतींनी या अभियानात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.इच्छुक शेतकऱ्यांना सहभागी करण्यात येणार जिल्ह्यातील प्रत्येक गावच्या ग्रामपंचायतीतून प्रत्येकी दोन कृषी सखींची निवड केली जाईल, जे इच्छुक शेतकऱ्यांचे अर्ज संकलित करून त्यांना नैसर्गिक शेती गटात समाविष्ट करण्याचे काम करतील. या अभियानाच्या अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी अध्यक्षतेत यांच्या जिल्हास्तरीय सनियंत्रण समिती स्थापन करण्यात येईल,

श्री रविंद्र भानुदास देवरवाडे, डॉ नरेंद्र जोशी, श्री रामप्रसाद डोईफोडे यांची राष्ट्रीय नैसर्गिक शेती मिशन आभियाना साठी निवड झाल्या बद्दल केज विधानसभा सदस्य मा आमदार सौ नमिताताई अक्षय मुंदडा यांनी ही अभिनंदन केले करून शुभेच्छा दिल्या आहेत त्याच बरोबर प्रकल्प संचालक एस, एम साळवे साहेब, कृषी विज्ञान केंद्र डिघोळ अंबाचे प्रमुख डॉ वसंतराव देशमुख,कृषी उपविभागीय श्री राहुल गायकवाड,तालुका कृषी अधिकारी विजय पवार यांनी ही शुभेच्छा दिल्या आहेत.


# शेतकऱ्यांनी बियाणे खरेदी करताना दक्षता घ्यावी :- अनिल बोर्डे

गेवराई / प्रतिनिधी
(दै.महाभारत)

खरीप हंगामाला लवकरच सुरुवात होणार आहे. खरीप हंगाम हा शेतकऱ्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा कालावधी असतो या कालावधीमध्ये शेतकरी वर्ग बियाणे खरेदीची लगबग असते अशा वेळेस शेतकरी बियाणे खरेदी करताना काळजी घेत नाही त्यामुळे त्याला नुकसानीचा सामना करावा लागतो त्यासाठी शेतकरी वर्गाने बियाणे खरेदी करताना फसवणूक होणार नाही याची दक्षता घ्यावी असे आवाहन बीड जिल्हा ग्राहक पंचायत महाराष्ट्र उपाध्यक्ष तथा गेवराई ग्राहक पंचायत मार्गदर्शन केंद्रप्रमुख अनिल बोर्डे यांनी या पत्राद्वारे केले आहे.

शेतकऱ्याने बियाणे खरेदी करताना परवानाधारक विक्रेत्याकडून बियाणे, खते खरेदी करावेत. परवानाधारक कृषी केंद्राकडून खरेदी करणे आवश्यक आहे. गावोगावी फिरणाऱ्या बियाणे विक्री करणाऱ्या एजंट धारकाकडून बियाणे खरेदी करू नयेत. शेतकऱ्यांनी बियाणाची योग्य जात निवडावी किंवा कृषी तज्ञाचे किंवा कृषी सहाय्यक यांचे मार्गदर्शन घ्यावे. बियाणाच्या पाकीटवर कंपनीचे नांव , लॉट नंबर, उत्पादन तारीख, अंतिम तारीख, वानाचे नांव, उगवण क्षमतेची टक्केवारी आणि पाकिटावर छापलेले लेबल तपासणे आवश्यक आहे. स्थानिक हवामान स्वच्छ रोगमुक्त एकसमान आकाराचे असावे कचरा, खराब बियाणे किंवा त्याला कीड नसावी. बियाण्याला बीज प्रक्रिया केली आहे का. कोणत्या औषधाची केली आहे ते तपासा, नसल्यास कोणत्या औषधाची बीज प्रक्रिया करावी याचा सल्ला कृषी तज्ञाकडून घेणे आवश्यक आहे. अंतिम तारीख झालेले बियाणे खरेदी करू नयेत ,त्याची उगवण क्षमता कमी असते. खरेदीचे अधिकृत पक्के बिल घ्यावे. जेणेकरून तक्रार असल्यास पुरावा मिळेल.

हायब्रीड बियाणे घेतल्यास त्याच्या लागवडीसाठी विशेष



काळजी खते याची माहिती घ्यावी. खरेदी केलेले बियाणे कोरड्या आणि थंड ठिकाणी साठवा जेणेकरून त्याची गुणवत्ता टिकेल. खरेदी केलेल्या बियाणाचे पाकीट आणि बिल जपून ठेवावे. विकत घेतलेल्या बियाणाची पाकिटे, अधिकृत बिल, थोडे फार प्रमाणात बियाणे हंगाम संपेपर्यंत राखून ठेवणे आवश्यक आहे. जेणेकरून काही तक्रार असल्यास पुरावा म्हणून ग्राह्य मानले जाते. पेरणीच्या वेळेस बियाणाची पिशवी शिलाई केलेल्या बाजूने न फोडता उलट्या बाजूने फोडावी. जेणेकरून पिशवीवरील टॅग व लेबल चांगले राहतील. ते टॅग आणि लेबल सांभाळून ठेवावे. या गोष्टीची काळजी घेतल्यास चांगल्या प्रतीचे बियाणे मिळेल आणि पिकाचे उत्पादन वाढेल.

शेतकरी वर्गाने स्वस्त बियाणाच्या आमिषाला बळी न पडता अधिकृत विक्रेते यांच्याकडून खरेदी करावी. त्याची पावती घेऊन जपून ठेवावी. शेतकऱ्याची काही तक्रार असल्यास कृषी विभागाशी संपर्क करावा. वरील बाबीची दक्षता शेतकरी बांधवांनी घ्यावी वरील काळजी घेऊन नुकसान झाल्यास ग्राहक पंचायत महाराष्ट्र यांच्याकडून मार्गदर्शन केले जाईल असे आवाहन बीड जिल्हा ग्राहक पंचायत महाराष्ट्र तथा गेवराई ग्राहक मार्गदर्शन केंद्र प्रमुख अनिल बोर्डे व गेवराई ग्राहक पंचायत अध्यक्ष प्रा. भानुदास फलके यांनी केले आहे.

# संतोष वाघ सर गुणवंत शिक्षक पुरस्काराने सन्मानित

## अन्न नागरी पुरवठा मंत्री छगनराव भुजबळ यांच्या शुभहस्ते पुरस्कार वितरण

निफाड ।रामभाऊ आवारे

माणुसकी फाउंडेशनच्या वतीने अन्न नागरी पुरवठा मंत्री छगनरावजी भुजबळ यांच्या शुभहस्ते शिक्षण क्षेत्रातील मानाचा व सन्मानाचा गुणवंत शिक्षक पुरस्कार ब्राह्मणगाव (वनस) तालुका निफाड येथील भुमी पुत्र तसेच मविप्र संचलित माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय जातेगाव तालुका नांदगाव विद्यालयाचे आदर्श शिक्षक संतोष सुखदेव वाघ सर यांना देण्यात आला आहे अशी माहिती माणुसकी फाउंडेशन चे संस्थापक अध्यक्ष पत्रकार सागर निकाळे व तालुका अध्यक्ष दिगंबर वडघुले यांनी दिली आहे.शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत माणुसकी फाउंडेशन च्या वतीने गुणवंत शिक्षक पुरस्कार संतोष वाघ यांना शाल ,सन्मानपत्र ,सन्मानचिन्ह देऊन यावेळी सन्मानित करण्यात आले.

अध्यक्षस्थानी नासिक




जिल्हा दूध उत्पादक संघ मा अध्यक्ष शिवाजी दादा ढेपले होते तर प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्याचे अन्न नागरी पुरवठा मंत्री छगनरावजी भुजबळ तसेच निफाड नगरपंचायतीचे अनिल कुंदे, माणुसकी फाउंडेशन चे संस्थापक अध्यक्ष पत्रकार सागर निकाळे, माणकेश्वर वाचनालयाचे अध्यक्ष मधुकर शेलार, वारकरी महामंडळाचे तालुका अध्यक्ष हरिश्चंद्र भवर, रयत चे जनरल बॉडी सदस्य डॉ सुजित गुंजाळ, लासलगाव बाजार समितीचे संचालक तसेच शिरवाडे सरपंच डॉ श्रीकांत आवारे, कवी राजेंद्र सोमवंशी, निंबाजी निकाळे साहेब, भुजबळ साहेबांचे स्वीय सहाय्यक महेश पैठणकर, ड शेखर देसाई,राणुजी कापडी आदी उपस्थित होते.

यावेळी वारकरी भूषण पुरस्कार विठोबा दादा आवारे शिरवाडे, गुणवंत शिक्षक लक्ष्मण विठ्ठलराव आवारे सर चांदवड, कृषीभूषण पुरस्कार ज्ञानेश्वर माऊली तासकर, महिला वारकरी कीर्तनकार हभप संगिता माई गुंजाळ लासलगाव, शेतीनिष्ठ शेतकरी केदु नाना शेळके शिरवाडे आदींसह विविध क्षेत्रातील पुरस्कारार्थींना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

# चंदनझिरा येथील इयत्ता १० वी तील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

जालना/प्रतिनिधी
(दै.महाभारत)

क्रांतीसुर्य महात्मा फुले प्रतिष्ठाण च्या वतीने चंदनझिरा परिसरातील इयत्ता १० वी तील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव हनुमान मंदिर येथील सभागृहात मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराज क्रांतीसुर्य महात्मा फुले,ज्ञानज्योती सावित्रीमाई फुले,विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर,पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आदी महापुरुषांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन जगन्नाथ चव्हाण,भगवानरावजी माथले,गणपतराव धोत्रे,संतोषजी जमधडे,मुख्याध्यापक सुभाषजी पारे,शिंदे कोचिंग क्लासेस चे संचालक शहाजी शिंदे सर,-वीं.दिनेशजी




दैने,सुरेशजी गोरे,दगडुजी विधाटे,रितेशजी पंचारिया उपस्थित होते.यावेळी कार्यक्रमाचे प्रस्ताविक करतानां लक्ष्मण घनवट क्रांतीसुर्य महात्मा फुले प्रतिष्ठाण च्या वतीने आपल्या परिसरातील विद्यार्थ्यांना कौतुकाची थाप देण्यासाठी व प्रोत्साहन वाढविण्यासाठी आम्ही हा सत्कार सोहळा आयोजित केला असे सांगितले व आमच्या भागात एखादी सुसज्ज अशी अभ्यासिका आणि ग्रंथालय उभारावं अशी मागणी करण्यात आली त्यास संतोष जमधडे यांनी लवरच आम्ही ती मागणी शासनाकडुन पुर्ण करण्यासाठी प्रयत्न करू असे सांगितले,तर विविध मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करत विद्यार्थ्यांनी आई-वडील व शाळेचे नाव शिक्षण घेऊन मोठे करावे आणि ख-ड/खझड ,डॉक्टर,इंजिनियर होऊन नावलौकिक करावे असे मार्गदर्शन केले.यावेळी कु.श्रेयसी रत्नपारखे हीने भावुक होत आपल्या आई-वडील व गुरूजनांचे आभाव व्यक्त करतं हा दिवस महापुरुषांमुळेच आज बघु शकलो असे सांगितले तर विद्यार्थी शाहिद अन्सारी यांने शिक्षक शाळेचे त्याच्या जीवनातील केलेली मदत याची जाणीव करून दिली.यावेळी एकुण ३० गुणवंत विद्यार्थीचां सत्कार मान्यवरांच्या शुभहस्ते प्रशस्तिपत्र व पुष्पगुच्छ व शैक्षणिक साहित्य देऊन करण्यात आले.यावेळी बाळासाहेब रत्नपारखे,संतोष काळे,सुनिल पारे,सुनिल आदमाने,आनंद धोत्रे,विजय पारे,अनिल तायडे,सचिन दैनै,शंकर धनवटे,सुरेश रत्नपारखे,रामप्रसाद भुतेकर,दिनेश राऊत,विजय शिंदे,सुरेश जोहरे,शरद काकडे,विष्णु खरात,तुळशीदास काळे,गणेश तिडके,रमेश तुपे यांच्यासह सुचसंचालक विकास खरात सर,अजय माथले,सतिश राऊत,नारायण चकवे,प्रताप ढोके,हर्ष अंभोरे,अजय पवार,वैभव बावणे,कार्तिक मोठे,दिपक मोठे,नितीन मोठे,करण गाडेकर यांच्यासह विद्यार्थीचे आई-वडील आणि परिसरातील प्रतिष्ठीत नागरिकांची उपस्थिती होती.

# जितेंद्र एकनाथ बागुल यांना कोल्हापूर येथे राज्यस्तरीय महाराष्ट्ररत्न पुरस्काराने सन्मानित

नाशिक / शांतारामभाऊ दुनबळे
(दै.महाभारत)

नाशिक-: कोल्हापूर येथे तेजस बहुउद्देशीय सामाजिक संस्था. यांच्याकडून १८ मे २०२५ रोजी राजश्री शाहूमहाराज स्मारक सभागृह कोल्हापूर.येथे नाशिक जिल्हा राष्ट्रीय रिपब्लिकन पक्षाचे युवा जिल्हाध्यक्ष जिंतेद्र बागुल याना महाराष्ट्र रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले ते राष्ट्रीय रिपब्लिकन पक्षचे नाशिक युवा जिल्हाध्यक्ष असून आतापर्यत त्यांना समाजभुषण पुरस्कार. जीवन गौरव पुरस्कार. महाराष्ट्र गौरव पुरस्कार. समाजहित रक्षक पुरस्कार. बहुजन रत्न पुरस्कार. जीवन संघर्ष यौद्धा पुरस्कार ने याअगोदर सन्मानित करण्यात आले आहे तसेच कोवीड च्या काळात त्यांच्या कडून समाजातील गरीब व गरजवंत लोकांना बरेच सहकार्य तसेच मदत मिळाली



म्हणून त्यांना कोवीड १९ यौद्धा हा पुरस्कार महाराष्ट्र सह मध्यप्रदेश,राज्यस्थान ,गुजरात राज्यातून त्यांना देण्यात आले आहे यां सर्व कामाचा तपशील बघून त्यांना आज महाराष्ट्र रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले यां वेळी सिने दिग्दर्शक व प्रोड्युसर अशोक कपूर सर. अभिनेत्री व संस्था अध्यक्ष मा.मेघा डोळस.कवी व लेखक महेंद्र तुपे सर. नागेश कवडे सर.वरप्रभा शिरगावकर.महेंद्र तुपे सर. यांच्या हस्ते देण्यात आले.त्यांच्या यां सन्मानाने त्यांचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे.

# शहापूर तालुक्यातील वेळुक कातकरी वाडीतील बालविवाह रोखण्यात प्रशासनास यश

ठाणे / बी.डी.गायकवाड

शहापूर तालुक्यातील वेळुक कातकरी वाडी येथे नियोजित असलेला बालविवाह प्रशासनाच्या सतर्कतेमुळे यशस्वीरित्या रोखण्यात आला.हा बालविवाह काल आयोजित करण्यात आला होता.या कारवाई दरम्यान बालविकास प्रकल्प अधिकारी धनश्री साळुंखे, कसारा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सुरेश गावित , पोलीस उपनिरीक्षक सागर जाधव, जिल्हा महिला व बाल विकास कार्यालयाच्या प्रतिनिधी दिपाली कांबळे, सेवा सामाजिक संस्थेचे सुरेखा विशे, पर्यवेक्षिका कसारा-१, तसेच मुख्य सेविका कविता जगताप (बीट - कसारा १, प्रकल्प - डोळखांब) यांनी संयुक्तरीत्या तात्काळ कारवाई करत बालविवाह थांबवला. विशेषतः मुख्य सेविका कविता जगताप यांनी प्रकरणाची माहिती मिळताच तत्परतेने प्रयत्न करून मोठ्या मेहनतीने हा बालविवाह थांबवण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली.

जिल्ह्यातील बालविवाह रोखण्याच्या कार्यवाहीबाबतची आकडेवारी वर्ष २०२४ : १८ बालविवाह प्रकरणे रोखण्यात आली वर्ष २०२५ : आज तारखेस ६ प्रकरणे यशस्वीरित्या रोखण्यात आली. ही आकडेवारी लक्षात घेता जिल्ह्यातील जनजागृती उपक्रम आणि प्रशासनाची तात्काळ कृती यामुळे बालविवाह प्रकरणांमध्ये लक्षणीय घट झाली आहे.

या यशस्वी हस्तक्षेपाबाबत जिल्हा कार्यक्रम अधिकारी संजय बागुल यांनी संपूर्ण पथकाचे व विशेषतः कर्मचारी व संबंधित अधिकार्यांचे कौतुक करताना म्हटले की, बालविवाहासारख्या सामाजिक संकटांवर प्रभावीपणे कारवाई करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. वेळेवर कृती करून एका बालिकेचे भविष्य वाचवणाऱ्या संपूर्ण पथकाचे त्यांनी अभिनंदन केले.

बालविकास विभाग, पोलीस प्रशासन, जिल्हा महिला व बाल विकास कार्यालय व स्वयंसेवी संस्थांनी दाखवलेली एकात्मता आणि सजगता ही समाजासाठी प्रेरणादायी बाब आहे. जिल्हा परिषद, ठाणे मार्फत सहकार्य व जनजागृतीचे उपक्रम पुढेही राबविण्यात येणार असून ग्रामस्थांनी देखील सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनामार्फत करण्यात येत आहे. आदिवासी भागातील जनतेमध्ये शिक्षण विषयक जाणीव अधिक प्रकर्षाने निर्माण करण्याची गरज असल्याचे मत अनेक सामाजिक कार्यकर्ते यांनी व्यक्त केले.

# माहूर वन उद्यानाचे जाळी कंपाउंडचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे

माहूर/दै. महाभारत

माहूर शहरातील वनपरिक्षेत्र अधिकारी कार्याला लागून असलेल्या जागेत सुरू असलेल्या वन उद्यान माहूर येथील जाळी कंपाऊंड कामात अनियमित्ता करून मोठ्या प्रमाणात गैरप्रकार करून निकृष्ट दर्जाचे कामे करण्यात आले असून याप्रकरणी उच्चस्तरीय चौकशी होईपर्यंत बिले अदा करण्यात येऊ नाही अशी मागणी पत्रकार ईलियास बावानी व प्रहार जनशक्ती किनवट माहूर विधानसभाचे कार्यअध्यक्ष दत्ता बोबडे यांनी नुकतीच लेखी निवेदनद्वारे संबंधित उपवनसंरक्षण केशव वाभळे माहूरचे वनपरिक्षेत्र अधिकारी रोहित जाधव यांच्याकडे तक्रार दाखल केली आहे.

माहूर वनपरिक्षेत्र अंतर्गत वनउद्यानाचे कामे करण्यात येत आहे. त्यात वन उदनाचे कंपाउंड चे जाळे कंपाउंड चे काम उपासे संस्थानाच्या नावाने टेंडर देण्यात आले आहे. प्रत्यक्ष संबंधित उपासे संस्था ज्याच्या नावावर आहे. तो अभियंता नांदेड जिल्हा परिषद मध्ये चल जीवन मिशनच्या शासकीय नोकरीचे करते व बजावत आहे. असे असताना त्यांना गुत्तेदारीचे टेंडर कसे काय भरता येतात असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे? सदर संस्थानाच्या नावावर मांडवी वनपरिक्षेत्रात उनकेश्वर परिमंडळाचे तायडे कार्यरत असलेले वनपाल व वनरक्षक हे शासकीय सेवेत असताना देखील हे गुत्तेदाराचे काम कर्मचारीच करत असल्याचे या कामावर येत जात असताना दिसून आले आहे. त्यांनी सदर चेनविल फिनिक्स चे जाळी कंपाऊंडच्या कामात मोठ्या प्रमाणात अनियमित करून पोल खालीवर बसविले तसेच कॉम्रेड माल बरोबर भरले नाही. लेवल पट्टी बसवली नाही, ८५० मीटर काम असून ७८० मीटरच करण्यात आले. खिळे व वेल्डिंग, बोल्ड कमजोर व कमी वापरण्यात आले. उनकेश्वर चे वनपाल व वनरक्षक यांनी मिळून उपासे संस्थेच्या नावावर वन विभागाच्या या कर्मचारी यांनी आपले कर्तव्य सोडून गुत्तेदारीचे कामे खुलेआम करीत आहे.

मांडवी वनपरिक्षेत्र अंतर्गत मोठ्या प्रमाणात पी एम वाय योजनेची बोगस कामे केली त्याबाबत तक्रार ही केली संबंधिताकडे आहे. तरी संबंधित वन



कर्मचारी बनलेले गुत्तेदार यांनी माहूर व गोधडी येथेही वन विभागांमध्ये कामे मंजूर करून टेंडर घेतल्याचे खात्रीलायक माहिती आहे. तेव्हा माहूर वन उदनाची चैनव्हील फेसिंग जाळी निकृष्ट दर्जाची करणाऱ्या कंट्रकदाराची व वन विभागाच्या शासकीय सेवेत कार्यत तथाकथेत त्या मांडवीच्या वनपाल व वनरक्षक याची कॉल डिटेल्स तपासणी पोलिसामार्फत करण्यात यावी जेणेकरून सत्यता बाहेर येईल. पण उद्यानाचे काम चांगले होत असेल तरी माहूर वन उद्यानाच्या निकृष्ट दर्जाच्या चेनविल फेसिंग जाळीप्रकरणी उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी. चौकशी होईपर्यंत या कामाचे देयके देण्यात येऊ नाय ही अशी मागणी वन परिक्षेत्र अधिकारी रोहित जाधव यांच्याकडे निवेदनद्वारे केली आहे.

# धामोरी गावाजवळील शिवार वाहतुकीचा खोकड रस्ता दुरूस्ती करण्याची मागणी

धामोरी / प्रतिनिधी
(दै.महाभारत)

कोपरगाव तालुक्यातील धामोरी गावाजवळील वाहतुकीसाठी मुख्य रस्ता समजला जाणारा खोकड रस्ता हा येथील शेतकरी व धामोरी ग्रामस्थ नागरिक व शैक्षणिक विद्यार्थ्यांना येण्याजाण्या साठी तसेच दळणवळणाच्या दुष्टीने महत्व पुर्ण समजला जातो.

हा रस्ता नवनाथनगर भागातील आनंदवल्ली येथील साई मंदिर या ठिकाणा पासुन पुढे ठाकरे मळा,वाणी मळा,काळोखे मळा पगार मळा व पुठे मोठा जगझाप



मळा येथे मिळतो.परंतु या रस्यावर पावसाळ्यात पाण्याने रस्याची अतिशय दयनीय अवस्था होताना दिसुन येतो. तरी संबंधित बांधकाम विभाग अधिकारी यांनी या शिवार वहातुक रस्याची लवकरात सुधारला करावी अशी मागणी येथील परिसरातील शेतकर-यांकडुन होत आहे.

# बीड जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी पदासाठी कंत्राटी पद्धतीने नियुक्ती बाबत

बीड / प्रतिनिधी
(दै.महाभारत)

जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांचे कार्यालयासाठी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी हे कंत्राटी पद निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात ११ महिन्याच्या कालावधीसाठी भरण्यासाठी जाहिरात व विहीत केलेला अर्जाचा नमूना या कार्यालयाचे वेबसाईटु.लशशव.पळल.ळप वर दि.२१.०५.२०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी या कंत्राटी पदासाठी उमेदवाराने आपला विहीत नमून्यातील अर्ज --४ साईजच्या पांढ्या कागदावर टंकलिखित - हस्तलिखित करुन मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा निवड समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड-४३११२२ या पत्यावर दिनांक २३ मे, २०२५ रोजीपासून ते दि. ०५ जून, २०२५ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत विहीत नमून्यात अर्ज पोहोचेल अशा रितीने पोस्टाद्वारे किंवा आवक जावक शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे समक्ष सादर करावेत. या कालावधीत कार्यालयीन वेळेत (सुटीचे दिवस वगळून) प्राप्त झालेल्या विहीत नमुन्यातील अर्जाचा विचार करण्यात येईल. अर्जाच्या पाकिटावर ठळक अक्षरात पदाचा उल्लेख करणे आवश्यक आहे.जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी या कंत्राटी पदासाठी शैक्षणिक अर्हता मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी, पदव्युत्तर पदवी (सामाजिक शास्त्रे किंवा आपत्ती व्यवस्थापन) अशी आहे. तसेच प्राप्त अर्जांच्या छाननीनंतर भरती प्रक्रियेसंदर्भात पुढील माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळ ु.लशशव.पळल.ळप वर प्रसिद्ध करण्यात येईल.जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी हे कंत्राटी पद निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात ११ महिन्याच्या कालावधीसाठी भरण्यासाठीची संपूर्ण भरती प्रक्रिया जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा निवड समिती, बीड यांचे मार्गदर्शनाखाली पार पाडली जाणार आहे, असे निवासी उपजिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, शिवकुमार स्वामी यांनी कळविले आहे.

# वरीष्ठ पोलीस निरीक्षक डॉ सुखदेव पाटील यांनी कु हिंमाशू कांबळे याला केले मार्गदर्शन

## छत्रपती शिवाजी महाराज व डॉ बाबासाहेब आंबेडकर हे आदर्श डोळ्यासमोर ठेवण्याचा दिला सल्ला!

कल्याण / प्रतिनिधी
(दै.महाभारत)

उल्हासनगर शहर वाहतूक शाखेचे कर्तव्यदक्ष, कर्तव्यनिष्ठ वरीष्ठ पोलीस निरीक्षक डॉ सुखदेव पाटील यांनी दहावीच्या परीक्षेत उज्वल यश मिळवल्या बद्दल कु हिंमाशू संजय कांबळे यांचे घरी जाऊन खास कौतुक केलं. पुढील शैक्षणिक आयुष्यासाठी मार्गदर्शन करुन जीवनात यशस्वी होण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज आणि घटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे आदर्श डोळ्यासमोर ठेवण्याचा सल्ला दिला.

वरीष्ठ पोलीस निरीक्षक डॉ सुखदेव पाटील हे कल्याण शहर वाहतूक शाखा, विठ्ठलवाडी वाहतूक शाखा आणि आता उल्हासनगर शहर वाहतूक शाखांमध्ये आपल्या कामाचा वेगळा 'ठसा, उमटवणारे डॉ सुखदेव पाटील हे कर्तव्यनिष्ठ व कर्तव्यदक्ष पोलीस अधिकारी म्हणून परिचित आहेत.



त्यांनी आज पत्रकार संजय कांबळे यांच्या घरी येवून कु हिंमाशू कांबळे याचे दहावी परीक्षेत उज्वल यश मिळवल्याबद्दल खास अभिनंदन केले. व आशिर्वाद दिले.

यावेळी बोलताना ते म्हणाले, पत्रकार संजय कांबळे यांनी अंत्यत प्रतिकूल परिस्थितीत 'आदर्श, पत्रकारिता केली,त्याप्रमाणे हिंमाशू ने कष्ट करण्याची तयारी ठेवावी, तूझ्या पाठीशी खंबीरपणे तूझ्या बापाची समर्थ साथ आहे, सर्व सोईसुविधा उपलब्ध आहे, फक्त जिद्द, चिकाटी, आणि कष्ट करण्याची क्षमता हवी, छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे आदर्श डोळ्यासमोर ठेवून त्यांची प्रेरणा घेऊन ध्येय निश्चितेकडे वाटचाल कर, तुला यश नक्की मिळेल असा विश्वास वरीष्ठ पोलीस निरीक्षक डॉ सुखदेव पाटील यांनी व्यक्त केला, आणि शुभेच्छा दिल्या,यावेळी त्यांच्या समवेत हितेश शिंदे, सामाजिक कार्यकर्ते गुरुनाथ गायकर, कु मयूर गायकर, कु आंन्शू कांबळे, पत्रकार संजय कांबळे

# वसंतदादा पाटील महाविद्यालयात अकरावी वर्गांच्या ऑनलाईन नोंदणीस सुरुवात



प्रा.एस खंडागळे / पाटोदा
(दै.महाभारत)

येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात अकरावी कला, वाणिज्य, विज्ञान व व्यावसायिक अभ्यासक्रम या वर्गांच्या प्रवेशाकरिता ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया २१ मे पासून सुरु करण्यात आली आहे.ऑनलाईन नोंदणी प्रक्रियेचे उद्घाटन प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. याप्रसंगी कमवि उपप्राचार्य प्रा. नामदेव चांगण, प्रवेश समितीचे प्रा. विठ्ठल शिंदे, डॉ. तानाजी आगळे, डॉ. मच्छिन्द्र शेळके, प्रा. सतीश कदम आदी उपस्थित होते.इयत्ता अकरावीच्या प्रवेशासाठी २१ मे ते २८ मे हा अवधी देण्यात आलेला असून इच्छुक पालक व विद्यार्थ्यांनी २८ मे च्या आत नोंदणी करून घ्यावी

# न.प.ने गणेशपार भागात बांधकाम परवाने देताना भविष्यातील वाहतूक कोंडीचा विचार करावा

## नागरिकांची मुख्याधिकार्याकडे निवेदनाद्वारे मागणी

परळी / विकास वाघमारे
( दै. महाभारत )

परळी शहरातील सर्वात जुना भाग असलेल्या गणेशपार भागात अगोदरच रस्ते अरुंद असुन यात नवीन बांधकाम करताना अगदी रस्त्याच्या कडेपर्यंत बांधकाम करण्यात येत असुन भविष्यातील वाहतुकीचा विचार करुन गणेशपार भागातील रस्त्यांच्या कडेला बांधकाम परवाने द्यावेत अशी मागणी या भागातील नागरिकांनी मुख्याधिकारी त्र्यंबक कांबळे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

गणेशपार हा परळीच्या गावभागातील महत्वपूर्ण असलेला भाग आहे. येथील गणेश मंदिर जवळ असलेल्या चौकात कायम गर्दी असते.जुना गावभाग असल्याने या भागात रस्ते अरुंद आहेत. कालांतराने वाढत जाणारी लोकसंख्या व वाहने यामुळे कायम वाहतूक कोंडी होत असते. तसेच



सांडपाण्याचेही प्रमाण वाढल्याने वारंवार नालीत कचरा अडकून पाणी रस्त्यावर येत असते.गणेश मंदिराजवळच सदर बाजार मशीद आहे.तसेच अनेक दुकाने असल्याकारणाने भविष्यातील मोठे रस्ते व नाल्या होणे गरजेचे आहे. परळी नगरपरिषदेने भविष्याचा विचार करून गणेशपार चौकात होणारे कुठलेही बांधकाम होताना व अनधिकृत बांधकामांना आळा घालावा वाहतुकीस अडथळे ठरतील असे बांधकाम परवाने देऊ नयेत अशी मागणी जी.एस.सौंदळे ,अश्विन मोगरकर,शिवाजी देशमुख,बाळु फुले,विजय जोशी,शरद चव्हाण, तुकाराम धुमाळ,बालासाहेब गित्ते जयप्रकाश बियाणी,गणेश जोशी आदींनी केली आहे.



परळी / विकास वाघमारे
( दै. महाभारत )

परळी वैद्यनाथ मतदारसंघाचे आमदार धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून परळी हे बारा ज्योतिर्लिंगापैकी पाचवे स्थान असल्याने येथील एसटी महामंडळाच्या आगारात नव्या दहा लाल परी बसेस उपलब्ध करून देण्यात आल्या असून या बसेसचे युवक नेते अजय मुंडे यांच्या सह मान्यवरांच्या हस्ते व महामंडळाच्या अधिकारी - कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत पूजन करून लोकार्पण करण्यात आले.

बारा ज्योतिर्लिंगापैकी पाचवे स्थान असलेल्या परळी आगारात ये - जा करणाऱ्या प्रवाशांची संख्या अधिक असल्याने येथे नवीन २० बसेसची मागणी धनंजय मुंडे यांनी केली होती. त्यापैकी महामंडळाच्या वतीने सध्या दहा नवीन बसेस उपलब्ध करून दिल्या आहेत. या बसेसचे आज विधिवत पूजन करून लोकार्पण करण्यात आले, यावेळी अजय मुंडे यांच्या सह मान्यवर पदाधिकारी व नागरिकांनी नवीन बस मधून फेरफटका मारला. यावेळी अजयजी मुंडे यांच्या सह राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष वैजनाथराव सोळंके, शहराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी, प्रा. विनोद जगतकर, बालाजी उर्फ पिंटू मुंडे, सुरेश टाक, के डी उपाडे, एजाज शेख, अनंत इंगळे, नितीन कुलकर्णी, शंकर कापसे, वसंत तिडके, संजय आघाव, सय्यद सिराज, दीपक तांदळे, रवी मुळे, अविनाश गवळी, सय्यद मुसा, रवी आघाव, महेंद्र रोडे, दत्ताभाऊ सावंत, गिरीश भोसले, गणेश सुरवसे, यांसह पदाधिकारी तसेच परळी आगाराचे अधिकारी - कर्मचारी उपस्थित होते.

# माजी जि. प. सदस्य विजयकुमार गंडले यांच्या जयंतीनिमित्त परळी उपजिल्हा रुग्णालयात फळ वाटप



## विजयकुमार गंडले यांचे सामाजिक कार्य उल्लेखनीय होते- अजय मुंडे

परळी / विकास वाघमारे
( दै. महाभारत )

बीड जिल्हा परिषदेचे माजी सदस्य, बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी संचालक तथा घाटनांदूर ग्रामपंचायतचे माजी उपसरपंच व फुले, शाहू, आंबेडकरी चळवळीतील जेष्ठ नेते विजयकुमार गंडले यांच्या जयंतीनिमित्त परळी उपजिल्हा रुग्णालयात रुग्णांना दिनांक २१ मे रोजी फळ वाटप करण्यात आले. यावेळी बीड जिल्हा परिषदेचे गटनेते राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते अजय मुंडे म्हणाले की, विजयकुमार गंडले यांचे सामाजिक कार्य उल्लेखनीय होते.

परळी उपजिल्हा रुग्णालयात संपन्न झालेल्या या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष बाजीराव भैया धर्माधिकारी उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. अरुण गुट्टे ,राष्ट्रवादी काँग्रेसचे परळी तालुका अध्यक्ष वैजनाथराव सोळंके , प्रा. डॉ .विनोद जगतकर, पद्मावती शिक्षण संस्थेचे सचिव, नेते दीपक तांदळे, जेष्ठ नेते सुरेश टाक, युवा नेते संजय आघाव,राष्ट्रवादी काँग्रेस सामाजिक न्याय विभागाचे तालुका अध्यक्ष दत्ताभाऊ सावंत, ज्येष्ठ नेते सोपानराव ताटे,युवा नेते सिराजभाई, माजी नगरसेवक महेंद्र रोडे,आयुबभाई पठाण, रवी मुळे,हे.भ.प. रामेश्वर महाराज कोकाटे, विठ्ठलराव झिलमेवाड,विलास ताटे,प्रा .संजय रणखांबे, भारत ताटे,पत्रकार संभाजी मुंडे, पत्रकार धीरज जंगले ,पत्रकार विकास वाघमारेआदी उपस्थित होते.

# संबोधीच्या सामुहिक विवाह सोहळा नोंदणीस प्रतिसाद

परभणी (प्रतिनिधी)

संबोधी अकादमीच्या वतीने रविवार, दि. १ जून रोजी आयोजित करण्यात आलेल्या सर्वधर्मिय सामुहिक विवाह सोहळ्याच्या नोंदणीस मोठा प्रतिसाद मिळत आहे. परभणी येथील महात्मा फुले विद्यालय येथे होणार्या सामुहिक विवाह सोहळ्यास देश विदेशातील अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. मंगल परिणय विधी पुज्य भदंत पय्याबोधी, नांदेड व भिक्खू संघ याच्या हस्ते संपन्न होणार आहे. या विवाह सोहळ्यात आजपर्यंत २५०० पेक्षा अधिक जोडपी विवाहबध्द झालेले आहेत. या विवाह सोहळ्यात सहभागी होणाऱ्या जोडप्यास महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागामार्फत कन्यादान योजनेतंर्गत वीस हजारचे अनुदान मिळणार आहे. तसेच संबोधी अकादमीच्या वतीने वधू-वरांना शुभ्र वस्त्र, सर्वांना सुरुची भोजन, वाजंत्री आदी सुविधा मोफत दिल्या जाणार आहेत. या विवाह सोहळ्यासाठी नोंदणीला प्रचंड प्रतिसाद मिळत असुन इच्छूकांनी २५ मे पर्यंत संबोधी अकादमी, महाराष्ट्रचे कार्यालय, गाळा क्रं. ६, सुपर मार्केट, कारेगाव रोड, परभणी येथे मो.क्र. ७७९८५४४७८६ यावर संपर्क करावा.वधु-वर नोंदणीसाठी मुलीचे वय १८ वर्ष पूर्ण तर मुलाचे वय २१ वर्ष पूर्ण असणे आवश्यक आहे. वयाचा पुरावा म्हणून टी.सी.,/ दहावीची सनद / जन्म प्रमाणपत्र यापैकी एक, चार पासपोर्ट फोटो, वधू किंवा वर यापैकी किमान एका जणाचे जातीचे प्रमाणपत्र, वधु-वराचे रहिवाशी प्रमाणपत्र नोंदणी अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

अधिक माहितीसाठी अविनाश मालसमिंदर-७७९८५४४७८६, यांच्याशी संपर्क करावा. सदरील विवाह सोहळ्यात जास्तीत जास्त सहभाग नोंदविण्याचे आवाहन विवाह सोहळ्याचे आयोजक संबोधी अकादमीचे अध्यक्ष समाजभूषण डॉ. भीमराव हत्तीअंबीरे, भगवानराव जगताप, डॉ. अरविंद सावते, शेषराव जल्हारे, सिध्दार्थ भराडे, गौतम साळवे, भीमराव पतंगे, शशिकांत हत्तीअंबीरे, बबन शिंदे, बाळासाहेब अंभिरे, डॉ. लक्ष्मण कांबळे, मुरलीधर ढेंबरे, ड. सुनिल बगाटे, बाळासाहेब किर्तने, विश्वनाथ डबडे, दि.फ. लोंढे, नवनाथ पैठणे, माधव मोते, गौतम कठाळे, राजेश चांदणे, एल.आर. कांबळे, भीमराव धबाले, राजेश पंडीत, बाबासाहेब भराडे, संतोष भराडे, संभाजी खिल्लारे, गंगाधर परसोडे, धनंजय रणविर, सोनाजी लांडगे, बाबासाहेब भुजावळे, दिपक जाधव, हेमंत घुगे, साहेबराव ढगे, उत्तम साळवे, अरुण पंचांगे, एकनाथ खंदारे, डॉ. नामदेव मुळे, प्रभाकर कांबळे, भीमराव श्रीखंडे, बंडू नरवाडे, सुर्यकांत उजगरे, सुरेश मगरे, बाबुराव गवळी, रोहिदास साखरे, गोमाजी श्रावणे, पवन कांडलीकर यांनी केले आहे.

# पूर्णा शहरात तिरंगा बाईक रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद



पूर्णा (प्रतिनिधी)

देशभक्तीने भारलेल्या वातावरणात बुधवार दि. २१ मे रोजी शहरात तिरंगा बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले. ऑपरेशन सिंदूरमधून देशासाठी पराक्रम गाजवणाऱ्या भारतीय सैन्याच्या शौर्याला सलाम करण्यासाठी शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

रॅलीची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयास माजी सैनिकांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. मातृभूमीसाठी प्राणांची आहुती देणाऱ्या सैन्याच्या सन्मानार्थ नागरिकांची एकात्मता आणि दृढ पाठिंबा या रॅलीतून ठळकपणे दिसून आला. कार्यक्रमात माजी सैनिक गणेशभाऊ कदम, मन्नूसिंह ठाकूर, शंकर डहाळे व सोमनाथ काकडे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. रॅलीत लक्ष्मीकांत (बाळू) कदम, डॉ. अजय ठाकूर, नितीन कदम, हरिभाऊ कदम, हनुमान शेठ अग्रवाल, राजेश भालेराव, दयाल ओझा, एकनाथ काळबांडे, विष्णू प्रताप कदम, अनंतराव पारवे बळीराम कदम, गोविंद ठाकर, प्रशांत कापसे, सुनील डुबीवार, राजेश धूत, राम पुरी, नाना चिटणीस, भारत ऐकलरे, बाबा ठाकूर, प्रभाकर कोर्टावर, राजू महाजन, गजानन कदम, अबनराव पारडे, संतोष पळसकर, गोविंद ठाकूर, विश्वनाथ होळकर, निलेश आगलावे, ईश्वर ठाकूर, किशोर सूर्यवंशी, हर्षल महाजन, अनिल बागल, जयसिंग चंदन, सदानंद पारडे आदी देशभक्तांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या प्रेरणादायी तिरंगा बाईक रॅलीचे आयोजन लक्ष्मीकांत कदम व गोविंद राज ठाकर यांनी केले होते.

# टेम्पोचालकाला मारहाण करून लुटले



प्रतिनिधी @ बीड

कोंबड्यांची वाहतूक करणाऱ्या टेम्पोचा पाठलाग करून, टेम्पो अडवून तीन तरुणांनी चालकाला मारहाण करून त्याच्याकडील १६ हजार रुपये व १० कोंबड्या लंपास केल्याची घटना ८ एप्रिल २०२५ रोजी घडली होती. या प्रकरणातील तीन आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गजाआड केले. पीएसआय श्रीराम खटावकर यांच्या पथकाने ही कारवाई केली.

शेख हसन शेख हुसेन (३९, रा. धनेगाव, जि. नांदेड) यांनी याबाबत तक्रार दिली होती. गुन्हे शाखेच्या पथकाने मंगळवारी अंगद खंडू काळूसे (२८, रा. महासांगवी ता. पाटोदा), प्रशांत धनराज भंडारे (२१) व अजय सदानंद धसे (२१, दोघे रा. पाटोदा) या तिघांना निष्पन्न करून अटक केली.

# ऑपरेशन सिंदूरच्या यशानंतर पंतप्रधान मोदींचा राजस्थान दौरा

प्रतिनिधी @ राजस्थान

पहलगाममध्ये पाकिस्तान पुरस्कृत अतिरेक्यांनी २६ नागरिकांची हत्या केली. यानंतर भारताने ऑपरेशन सिंदूर करुन अतिरेक्यांचे पाकिस्तानमधील तळ नष्ट केले. या ऑपरेशनच्या यशानंतर पंतप्रधान मोदी पहिल्यांदाच राजस्थानचा दौरा करणार आहेत. दिल्लीतून विशेष विमानाने पंतप्रधान राजस्थानला जाणार आहे. पंतप्रधान मोदींच्या दौऱ्याची सुरुवात बिकानेरमधून गुरुवार २२ मे रोजी सकाळी ११ वाजता होणार आहे. देशनोक इथल्या करणी माता मंदिरात जाऊन दर्शन घेऊन पंतप्रधान दौऱ्याची औपचारिक सुरुवात करतील.

पंतप्रधान मोदींच्या हस्ते सकाळी साडेअकरा वाजता अमृत भारत स्थानक योजनेअंतर्गत पुनर्विकसित केलेल्या देशनोक रेल्वे स्थानकाचे उद्घाटन होणार आहे. यावेळी पंतप्रधान बिकानेर - मुंबई एक्सप्रेस रेल्वेगाडीला हिरवा झेंडाही दाखवतील. त्यानंतर, ते २६ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्चाच्या अनेक विकास प्रकल्पांची पायाभरणी, उद्घाटन आणि राष्ट्रार्पण करणार आहेत . यानिमित्ताने पंतप्रधान पलाना इथे एका जाहीर कार्यक्रमाला संबोधितही करतील.

पंतप्रधान भारतातील अठरा राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांतील ८६ जिल्ह्यांमधील १०३ पुनर्विकसित अमृत स्थानकांचे उद्घाटनही करणार आहेत. या रेल्वे स्थानकांसाठी अकराशे कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च करण्यात आला आहे. मृत भारत स्थानक योजनेअंतर्गत तेराशेपेक्षा जास्त स्थानकांचा आधुनिक सेवा सुविधांसह पुनर्विकास केला जात आहे. याअंतर्गत रेल्वे स्थानकांमध्ये प्रवाशांसाठीच्या सोयी सुविधांचा विस्तार केला जात असून, या रेल्वे स्थानकांच्या उभारणीत प्रादेशिक वास्तुकलेचे प्रतिबिंब उमटेल अशा दृष्टीने त्यांची रचना केली गेली आहे. या योजनेअंतर्गतच पुनर्विकसित केले गेलेले देशनोक रेल्वे स्थानक हे करणी माता मंदिराला भेट देणारे भाविक आणि पर्यटकांसाठी महत्वाचे स्थानक आहे. त्या अनुषंगाने या स्थानकाची बांधणी ही करणी माता मंदिराची स्थापत्यकला, तसेच मंदिराच्या कमानी आणि स्तंभांवरून प्रेरित आहे. याचप्रमाणे तेलंगणामधील बेगमपेट रेल्वे स्थानक देखील काकतीय साम्राज्याच्या स्थापत्यकलेपासून प्रेरणा घेत उभारले गेले आहे. तर बिहारमधील थावे रेल्वे स्थानकात ५२ शक्तिपीठांपैकी एक असलेल्या माता थावेवालीची प्रचिती देणारी विविध भित्तिचित्रे, कलाकृती आणि मधुबनी चित्रकला शैलीत साकारलेल्या चित्रांचा अंतर्भाव केला आहे. अशाच प्रकारे गुजरातमधील डाकोर रेल्वे स्थानक देखील रणछोडरायजी महाराजांपासून प्रेरणा घेत उभारले गेले आहे. अशापद्धतीने देशभरातली पुनर्विकसित केलेली अमृत स्थानकांच्या उभारणीत आधुनिक पायाभूत सुविधांना सांस्कृतिक वारसा, दिव्यांगजन अनुकुल सोयी सुविधांसह जनसामान्यांसाठीच्या सुविधा आणि प्रवासाचा समृद्ध अनुभव घेता येईल अशा प्रकारच्या शाश्वत पद्धतींचे अनोखे एकात्मिकरण घडवून आणले आहे.

देशभर विस्तारलेल्या रेल्वे सेवा जाळ्याचे शंभर टक्के विद्युतीकरण करण्याच्या दिशेने भारतीय रेल्वेची वाटचाल सुरू आहे. यामुळे रेल्वेचे कार्यान्वयन अधिक सक्षम आणि पर्यावरणपूरक होऊ शकणार आहे. याच अनुषंगाने पंतप्रधान चुरू - सादुलपूर या रेल्वे मार्गाची (५८ किमी) पायाभरणीही करतील, तसेच ते सूरतगड-फलोदी (३३६ किमी), फुलेरा-डेगाना (१०९ किमी), उदयपूर-हिम्मतनगर (२१० किमी), फलोदी-जैसलमेर (१५७ किमी) आणि समदारी-बाडमेर (१२९ किमी) या रेल्वे विद्युतीकरण पूर्ण झालेल्या रेल्वे मार्गांचे राष्ट्रार्पण करतील.




राज्यातील रस्तेविषयक पायाभूत सुविधांना मोठी चालना देत पंतप्रधान या प्रसंगी ३ वाहनोपयोगी भुयारी मार्गांचे बांधकाम तसेच राष्ट्रीय महामार्गांचे रुंदीकरण आणि बळकटीकरण या कामांची पायाभरणी करतील. त्यांच्या हस्ते राजस्थानातील सात रस्ते प्रकल्पांचे लोकार्पण देखील होईल.सुमारे ४८५० कोटी रुपयांहून अधिक खर्चाचे हे रस्ते प्रकल्प त्या भागांतील वस्तू आणि माणसे यांच्या अधिक सुलभ गतिशीलतेला चालना देतील. हे महामार्ग भारत-पाकिस्तान सीमेपर्यंत विस्तारण्यात येणार असून त्याद्वारे संरक्षण दलांची त्या भागापर्यंत पोहोच सुधारून, भारताच्या संरक्षण पायाभूत सुविधा अधिक बळकट होतील.

# सर्दी तर होणारच ना...!

पावसाळा आला की पावसाळी छत्र्या येणारच असं मराठीत गंमतीने म्हटलं जातं आणि ते देखील खरच आहे. जंगली मशरूम अर्थात पावसाळी छत्री या आशयाने इथं अर्थ घेतला जात असतो. मात्र येणाऱ्या पावसासोबत ज्या काही गोष्टी समोर येतात त्यात पावसाळ्यात होणारे आजार अर्थात साथरोग देखील येऊ शकतात आणि साथरोगाची ही आपत्ती रोखली नाही तर मोठा गोंधळ निर्माण होतो.

पावसात भिजल्यानंतर सर्दी होणे हे अगदी सहाजिक आहे. प्रत्येक वेळी आपण छत्री अथवा रेनकोट घेऊन फिरत नाही आणि अनेकदा वाहनाच्या डिक्कीतला रेनकोट परिधान करेपर्यंत आपण भिजलेलो असतो. लहान बालकांची प्रतिकारशक्ती तुलनेत कमी असली तरी त्यांना याचा धोका कमी आहे. मात्र तथापि दुसऱ्या बाजूस घरातून पालकांकडून याचा प्रसार होऊ शकतो.साधारणपणे सर्दी-पडसे हा पावसाळ्यातील सवयीचा आजार आहे आणि त्यावर मुख्यतः घरगुती इलाज होताना दिसतात. स्वतःहून औषधे घेणे आणि मुलांना देणे असे प्रकार प्रचलीत आहेत. अनेकदा टि.व्ही. वरील जाहिराती बघुनही औषधे घेतली तसेच दिली जाताना दिसतात परंतु नेमकेपणाने निदान करून मगच औषधे घ्यावीत हे उत्तम.विविध प्रकारच्या औषधांचा स्वतःहून वापर करणे कुणासाठीही धोकादायकच म्हणावे लागेल कारण या औषधांचे चांगले परिणाम होवून आजारातून बरे होता येईल ही अपेक्षा असते. मात्र या प्रकारच्या औषधांचे दुष्परिणाम काय होतात याची माहिती नसल्याने त्याचा उलटा परिणाम होवू शकतो. आरोग्यासाठी हा धोका पत्करू नये.

आपल्याकडे निष्काळजीपण, दुर्लक्ष करणे आणि दुखणे अंगावर काढणे असेही प्रकार दिसून येतात. यातूनही आजारपण वाढू शकते. त्यामुळे आजारी पडल्यावर न चुकता वैद्यकीय सल्ला घेणं केव्हाही उत्तम.आपले शरीर मुख्यत्वे पाण्यावर अवलंबून असते. आणि पावसाळ्यात जे आजार आढळून येतात त्यापैकी साधारण ७० टक्के, आजार हे पाण्यामुळे होतात. त्यात पाण्यातील जिवाणुंमुळे होणारे आजार वेगळे आणि विषाणुंमूळे होणारे आजार वेगळे आहेत. या सर्वांचे मुळ अर्थात पाणी हेच आहे.पावसाळ्यात अनेक विषाणू सक्रिय होतात. त्यामुळे शुद्ध पिण्याचे पाणी हा आजारांना दूर




ठेवण्याचा सर्वोत्तम उपाय आहे. पावसाळ्यात अनेक ठिकाणी जलसाठे दुषित होतात. त्यामुळे आजारांचा धोका वाढत असतो. घरात पिण्याचे पाणी उकळून ते थंड करून घेणे चांगले. पाणी उकळल्याने त्यातील सर्व जिवाणू, विषाणू मरतात. त्यामुळे ज्या ठिकाणी शुद्ध पाणी नाही त्या ठिकाणी पाणी उकळूनच प्यावे.

पाण्यातील अशुध्दपणा दूर करण्याचा आणखी एक उपाय म्हणजे तुरटीचा वापर करणे होय. बाजारात तुरटी सहजरित्या उपलब्ध असते. कोणत्याही किराणा दुकानात ती आपणास खरेदी करता येईल. पाण्यात तुरटी फिरविल्यास गाळ खाली बसेल नंतर त्याचा वापर करता येईल.पाण्यात तुरटी फिरवणे सर्वच अर्थाने आपल्या आरोग्यासाठी सहाय्यकारी ठरणार आहे. तुरटीच्या पाण्याने अंघोळ केल्यास त्वचेवर होणारा संसर्ग कमी होतो. हे पाणी त्वचेतील मृतपेशी काढून टाकण्यास मदत करते. जखम लवकर भरणे आणि संसर्ग कमी करणे या दोन्हींमध्ये तुरटी लाभदायक आहे.

आला पावसाळा म्हणजे आरोग्य सांभाळा असाच संदेश मानून पावसात भिजण्याचा आनंद घ्यायला देखील हरकत नाही.

प्रशांत विजया अनंत दैठणकर
(जिल्हा माहिती अधिकारी)
बीड
चलभाषा क्र. ९८२३१९९४६६

# सलगरा फाटा ते बेटमोगरा रस्त्यावरील नंदगाव पाटी ते कर्णा फाटा दरम्यान चा रस्ता बनला जीवघेणा



## रस्ता दुरुस्त करण्याची सामाजिक कार्यकर्ते भारत सोनकांबळे बेटमोगरेकर यांची सार्वजनिक बांधकाम उपविभागाकडे निवेदनाद्वारे मागणी

मुखेड/प्रतिनिधी

तालुक्यातील सलगरा फाटा ते बेटमोगरा कडे जाणाऱ्या रस्त्यावरील नंदगाव पाटी ते कर्णा फाटा दरम्यानचा रस्ता अतिशय खड्डेमय झाला असून या रस्त्यावर अक्षरश: खड्डे खडे पडून ह्या रस्त्याची चाळण झालेली आहे, सद्यस्थितीत हा रस्ता प्रवाशांचा जीवघेणा बनला आहे. या रस्त्यावरून वाहतुकीची रहदारी वाढली असून जास्त वजनाच्या गाड्या या रस्त्यावरून जात असल्याने रोड (रस्ता) पूर्णतः उखडून गेला आहे. अवघ्या काही दिवसांनंतर पावसाळा (मान्सून ऋतू) सुरू होईल तेव्हा या रस्त्यावर पडलेल्या मोठमोठ्या खड्ड्यांमध्ये पावसाचे पाणी साचून खड्डे भरल्या जातील तसेच या रस्त्यावरील वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होईल त्यामुळे मोठा अपघात होऊन मोठ्या प्रमाणात जीवित हानी होण्याची दाट शक्यता असल्याने बेटमोगरा येथील सामाजिक कार्यकर्ते तथा निर्भीड पत्रकार भारत सोनकांबळे

बेटमोगरेकर यांनी दि.२१ मे २०२५ रोजी मा.कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग मुखेड यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे तात्काळ हा रस्ता दुरुस्त करण्यात यावा अशा आशयाचे निवेदन दिले आहे. तसेच भारत सोनकांबळे यांनी दिलेल्या निवेदनात असेही म्हटले की, सदर दिलेल्या निवेदनाची गांभीर्याने दखल घेऊन सलगरा फाटा ते बेटमोगरा कडे जाणाऱ्या रस्त्यावरील नंदगाव पाटी ते कर्णा फाटा दरम्यानचा रस्ता तात्काळ दुरुस्त करण्यात यावा अन्यथा सार्वजनिक बांधकाम उपविभाग मुखेड कार्यालयासमोर